दैनिक
राष्ट्रसह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक २७ । गुरुवार ५ नोव्हेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

ट्रम्प यांना दणका...
अमेरिकन काँग्रेसवर डेमोक्रॅट्सचे वर्चस्व!



वॉशिंग्टन : अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला मोठा धक्का बसला असून विरोधी डेमोक्रॅटिक पक्षाने सिनेट आणि प्रतिनिधीगृह या दोन्ही सभागृहांमध्ये बहुमत मिळवले आहे. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील ही मोठी राजकीय पीछेहाट मानली जात आहे.

प्रतिनिधीगृहातील ४३५ जागांपैकी डेमोक्रॅटिक पक्षाने बहुमताचा आकडा ओलांडत आघाडी घेतली आहे. सिनेटमध्येही सात जागांवर विजय मिळवत डेमोक्रॅट्सनी सत्तेचे पारडे आपल्या बाजूने झुकवले. विशेष म्हणजे, ट्रम्प यांचे पारंपरिक बालेकिल्ले मानल्या जाणाऱ्या राज्यांमध्येही रिपब्लिकन उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. महागाई, वाढता जीवनावश्यक खर्च आणि इराणमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर मतदारांनी ट्रम्प सरकारविरोधात कौल दिल्याचे विश्लेषण होत आहे. या निकालामुळे ट्रम्प यांच्या उर्वरित दोन वर्षांच्या कार्यकाळात विरोधकांचे आव्हान वाढणार असून सरकारच्या धोरणांवर संसदीय अंकुश निर्माण होणार आहे.

'मी आमदार होणार... तुझे भले करतो!'
आमिष दाखवून 'नाना'ने १५ वर्षे शारीरिक शोषण केल्याचा माहिलेचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : 'मी राजकारणातील मोठा माणूस आहे. तालुक्याचा, जिल्ह्याचा नेता आहे. उद्या आमदार होणार; माझ्यासोबत संबंध ठेव, तुझ्याशी लग्न करून तुझे भले करतो,' असे आमिष दाखवून अहिल्यानगर जिल्ह्यातील एका बड्या राजकीय व्यक्तीने तब्बल १५ वर्षे शारीरिक शोषण केल्याचा गंभीर आरोप श्रीरामपूर तालुक्यातील एका महिलेने केला आहे. या प्रकरणी संबंधित महिलेने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

अहिल्यानगरसह पुणे जिल्ह्यात अत्याचार झाल्याचा दावा

पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, 'नाना' या नावाने परिचित असलेल्या संबंधित राजकीय व्यक्तीने लग्नाचे आश्वासन देत तिच्याशी संबंध प्रस्थापित केले.

त्यानंतर अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील विविध ठिकाणी वेळोवेळी अत्याचार केल्याचा तिचा आरोप आहे. गर्भनिरोधक गोळ्या घेण्यास भाग पाडून शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचेही तिने तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणाची माहिती संबंधित व्यक्तीच्या मित्रपरिवारासह कुटुंबीयांनाही होती, असा दावा महिलेने केला आहे. राहुरी तालुक्यातील दोन डॉक्टरांनीही संबंधित राजकीय व्यक्तीला मदत केल्याचा आरोप तिने केला आहे. इतकेच नव्हे, तर संबंधित व्यक्तीची पत्नी, मित्रमंडळी आणि पत्नीच्या नातेवाइकांकडून आपल्यावर जीवघेणे हल्ले झाल्याचा दावाही तिने केला आहे.

या संबंधांमुळे आपले कौटुंबिक आयुष्य उद्ध्वस्त झाले असून, संबंधित व्यक्तीने लग्नाचे आश्वासन देऊन केवळ गैरवापर केल्याची भावना महिलेने व्यक्त केली आहे. 'माझी तक्रार कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नाही. माझे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्याला शिक्षा झालीच पाहिजे,' अशी ठाम भूमिका तिने पोलीस अधिकाऱ्यांसमोर मांडल्याचे समजते.

विशेष म्हणजे, संबंधित महिलेचा राजकीय व्यक्तीच्या पत्नीसोबतही संवाद असल्याचे तिने सांगितले. एकदा दोघींनाही संबंधित व्यक्तीने तुळजाभवानीचे दर्शन घडविल्याचा दावाही तक्रारीत करण्यात आला आहे.

पोलिसांच्या भूमिकेकडे लक्ष

पंधरा वर्षांच्या कथित शोषणाचा हा गंभीर आरोप असून, तक्रारीतील दाव्यांची सत्यता तपासणे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. अद्याप तक्रारीवर गुन्हा दाखल झाला नाही. आरोप करण्यात आलेल्या संबंधित व्यक्तीची बाजूही समोर आलेली नाही. त्यामुळे तक्रारीची चौकशी करून तथ्यांच्या आधारे पुढील कारवाई होते का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दिवाळीपूर्वी ७३ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजारांची मदत!

उर्वरित पात्र शेतकऱ्यांना दोन दिवसांत रक्कम मिळणार : मुख्यमंत्री फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



मुंबई : दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. दिवाळीपूर्वी प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याच्या निर्णयानुसार आतापर्यंत ७३ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत मदतीची रक्कम जमा करण्यात आली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही पुढील दोन दिवसांत मदत मिळणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

यंदा अपुरा पाऊस, दुष्काळी परिस्थिती आणि खरीप पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शेती उत्पादनात घट झाल्याने आगामी हंगामाचा खर्च आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत सरकारने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची अग्रीम मदत दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची ठरणार आहे.

दरम्यान, काही लाभार्थ्यांच्या बँक खात्यांतील त्रुटी, आधार संलग्नता आणि तांत्रिक अडचणींमुळे मदत जमा होण्यास विलंब होत आहे. या अडचणी दूर करून उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही निर्धारित कालावधीत मदत देण्याचे नियोजन सरकारने केले आहे. ७३ लाख शेतकऱ्यांना मदत मिळाली असली, तरी प्रत्यक्ष पीक नुकसानीच्या तुलनेत पाच हजार रुपयांची मदत कितपत पुरेशी ठरणार, असा प्रश्न शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे. त्यामुळे उर्वरित लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम कधी जमा होते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

महत्त्वाचे..

आंदोलनाला गैरहजेरी : काँग्रेसचे २०० नेते निलंबित!

नवी दिल्ली : काँग्रेसने २०० नेत्यांचं तडकाफडकी निलंबन केले. १ नोव्हेंबर रोजी दिल्लीच्या रामलीला मैदानावर झालेल्या इंडिया आघाडीच्या महारॅलीमध्ये सहभागी न झाल्याने काँग्रेसने ही मोठी कारवाई केली. व्होट बचाओ, देश बचाओ महारॅलीला उपस्थित न राहिल्याने ७ राज्यांमधील २०० हून अधिक नेत्यांना काँग्रेसकडून निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काँग्रेसने गुजरातमधीस ४९, पश्चिम बंगालमध्ये २६, उत्तर प्रदेशात ११, तेलंगणामध्ये १४, हरियाणात १०, मध्य प्रदेशात ६० आणि झारखंडमधील ३२ नेत्यांना निलंबित केले आहे. निलंबित करण्यात आलेल्या नेत्यांमध्ये राज्य युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष, सरचिटणीस आणि सचिव-स्तरीय नेत्यांचा समावेश आहे.

पाच हजार नाही...
शेतकऱ्यांना अपेक्षित मदत करावी : आदित्य ठाकरे

कुकाणा येथे शेतकरी मदत केंद्राचे आदित्य ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : राज्यातील दुष्काळी परिस्थिती गंभीर असताना शेतकऱ्यांना केवळ पाच हजार रुपयांची मदत देऊन त्यांच्या समस्या सुटणार नाहीत. शेतकऱ्यांचे झालेले नुकसान लक्षात घेऊन त्यांना अपेक्षित असलेली आर्थिक मदत सरकारने द्यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवा नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी केली.

नेवासा तालुक्यातील कुकाणा येथे शिवसेनेच्या वतीने उभारण्यात आलेल्या शेतकरी मदत केंद्राचे उद्घाटन बुधवारी आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.



कुकाणा : येथे शेतकरी मदत केंद्राचे उद्घाटन करताना आदित्य ठाकरे. समवेत माजी खासदार चंद्रकांत खैरे, अंबादास दानवे, रामदास गोल्हार, उदयन गडाख, सुनील शिंदे आदी. (छाया : सुधीर चव्हाण, नेवासा)

यावेळी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. राज्यात तीनशेहून अधिक तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला असून अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. एका बाजूला शेतकऱ्यांना प्यायला पाणी मिळत नाही, (पान ४ वर)

तावीजच्या बहाण्याने महिलेवर मौलानाचा अत्याचार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : श्रीरामपूर शहरातील एका ३२ वर्षीय अविवाहित महिलेवर अहिल्यानगर येथील एका मौलानाने जबरदस्ती बलात्कार केला. तर दुसऱ्या एका मौलाना ने महिलेचा विनयभंग करुन सदर प्रकरण मिटवुन घे, नाहीतर जिवे मारुन टाकीन अशी धमकी दिली. ही घटना दि. ३० ऑक्टोबर रोजी राहुरी पोलीस ठाणे हद्दीत घडली.

एक ३२ वर्षीय अविवाहित महिला

प्रकरण मिटवून घे अन्यथा जिवे मारून टाकू; दुसऱ्या मौलानाची पिडीतेला धमकी

श्रीरामपुर शहरात तीच्या आई सोबत राहते. आई नेहमी आजारी असल्याने तीला आराम मिळावा म्हणुन पिडीत महिला राहाता तालुक्यातील कोल्हार बुद्रुक येथील मशिदमधील मौलानाकडे नेहमी जात होती. दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास पिडीत महिला कोल्हार बुद्रुक येथील मशिदमधील मौलानाकडे गेली होती. महिलेने तेथील मौलानाकडुन आईच्या आजारपणासाठी तावीज घेवुन मशिदीच्या बाहेर येत असतांना तेथे तीला शरिफ शेख नामक दुसरा मौलाना भेटला व तो त्या महिलेला म्हणाला की, येथे काही होणार नाही तुम्ही आमचे मोठे मौलानाकडे चला, मी तुम्हाला त्यांच्याकडे घेवुन जातो. त्यांच्याकडे तुमच्या (पान ४ वर)

॥ सस्नेह जय जिनेन्द्र ॥



आमचे पिताश्री
आदरणीय श्री रमेशजी लोढा
यांच्या 78 व्या वाढदिवसानिमित्त

जैन समाजातील सर्व मान्यवर, डॉक्टर, वकील, मित्रमंडळी, आप्तेष्ट व हितचिंतकांनी प्रत्यक्ष भेटून, फोनद्वारे तसेच संदेशांच्या माध्यमातून भरभरून शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

आभार!

आपण सर्वांनी दाखवलेले प्रेम, आपुलकी आणि सदिच्छा आमच्यासाठी अनमोल आहेत. आपल्या सर्वांच्या शुभेच्छांचा आम्ही मनःपूर्वक स्वीकार करतो आणि आपण सर्वांचे मनापासून आभार मानतो.

आपले प्रेम व आशीर्वाद असेच सदैव आमच्या पाठीशी राहोत, हीच सदिच्छा !

आपले स्नेहांकित,
विलास, राहुल, कमलेश, पंकज, लोकेश, मेहुल व स्वयंम
समस्त लोढा परिवार

भावपूर्ण श्रद्धांजली



कै.उद्धवराव (तात्या)श्रीपती नवले
यांना बुधवार दि.२८/१०/२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता देवज्ञा झाली असुन त्यांचा

दशक्रिया विधी

शुक्रवार दि.०६/११/२०२६ रोजी सकाळी ०९ वाजता होणार आहे.

* दुखांकित *

श्री.सोपान गोपीनाथ नवले (पुतणे)
श्री.गोरक्षनाथ सुखदेव नवले (पुतणे)
श्री.राजेंद्र उद्धवराव नवले (मुलगा)
श्री.वैभव उद्धवराव नवले (मुलगा)
श्री.गणेश बबनराव नवले (नातु)
श्रीमती.शोभा जालिंदर पवार (पुतणी)
सौ.आशा सुभाष नळे (पुतणी)
श्री.भाऊसाहेब खंडेराव नवले (पुतणे)
श्री.अशोक खंडेराव नवले (पुतणे)
श्री.बाळासाहेब बाजीराव नवले (पुतणे)
श्री.पोपटराव बाजीराव नवले (पुतणे)
श्री.सुरेश खंडेराव नवले (पुतणे)
श्री.दिपक बाबासाहेब नवले (नातु)
सौ.सुमन नारायण आरगडे (पुतणी)

* दशक्रिया विधी ठिकाण *
नवले वस्ती,चिंचोली
रोड भेंडा खुर्द

|| समस्त नवले पा.परिवार ||

दशक्रिया विधी निमित्त किर्तन सेवा:- ह.भ.प.मच्छिंद्र महाराज निकम यांचे सकाळी ०८ ते १० किर्तन सेवा होईल.

शिक्षण विभागाच्या मनमानी कारभाराविरोधात शिक्षकांचा ऐतिहासिक महामोर्चा

- शुक्रवारी शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयाला टाळे ठोकणार
- खासदार नीलेश लंके यांचा इशारा, आमदार सत्यजित तांबे यांचाही आंदोलनाला पाठिंबा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील कथित मनमानी कारभार, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता बोजा आणि विविध प्रशासकीय समस्यांच्या निषेधार्थ जिल्हाभरातील हजारो शिक्षकांनी जिल्हा परिषदेवर महामोर्चा काढला. शिक्षकांच्या आजवरच्या आंदोलनांमधील हा सर्वाधिक मोठा मोर्चा असल्याचा दावा करण्यात आला. यावेळी खासदार नीलेश लंके यांनी शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना दोन दिवसांत बदली करून घेण्याचा किंवा सक्तीच्या रजेवर जाण्याचा इशारा दिला. अन्यथा शुक्रवारी स्वतः त्यांच्या कार्यालयाला टाळे ठोकणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

जिल्हाभरातील शिक्षक राष्ट्रीय पाठशाळेच्या प्रांगणात एकत्र आले. दुपारी सव्वाबारा वाजता सुरू झालेला मोर्चा अवघ्या पंधरा मिनिटांत जिल्हा परिषदेत पोहोचला. महिला शिक्षकांची उपस्थिती लक्षणीय होती. 'आम्हाला शिकू द्या', 'शनिवारशिवाय ऑनलाइन कामे देऊ नका', 'बिनकामाच्या ॲपवरील माहिती भरणे बंद करा', 'मिशन आरंभच्या परीक्षा शाळास्तरावर घ्या', अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

खासदार लंके यांनी शिक्षण विभागाच्या कारभारावर टीका करत शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या गेल्या पाच वर्षांतील कामकाजाची विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी केली. शिक्षण विभागात पदोन्नती (पान ४ वर)

गरिबीचे मोजमाप : भ्रम आणि वास्तव

जागतिक बँकेने नुकताच 'इंडिया पूवर्टी अँड इक्विटी ब्रिफ' नावाने अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात भारतात २०११ ते २०२३ या काळात ४९.६ कोटी लोक गरिबीबाहेर म्हणजेच दारिद्र्य रेषेबाहेर आल्याचे नमूद केले आहे. तसेच गरिबीचा दर ९० टक्क्यांनी घसरला आहे, असे स्पष्ट केले आहे. याशिवाय २०११ मध्ये असलेला २७.१% गरिबीचा दर थेट २.६ टक्क्यावर आल्याचे म्हटले आहे. देशात दररोज ४०० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या लोकांची संख्या ५७.७ टक्क्याच्या तुलनेत २०२८ पर्यंत १६.१ टक्क्यांपर्यंत खाली येण्याचा अंदाज वर्तवला आहे.

सदर अहवालाची भारतीय अर्थतज्ञाकडून अद्यापी पुष्टी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर अहवालातील आकडेवारीची सत्यता तपासणे गरजेचे ठरते. याचे कारण जागतिक बँकेने गरिबीबाबतचे लावलेले निकष. उपलब्ध माहितीनुसार जागतिक बँकेने भारतीय कुटूंबांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनातून जो आर्थिक लाभ मिळतो, तो कुटूंबाच्या उत्पन्नात गृहित धरलाय. इथेच ह्या अहवालाची फसगत होते. शासकीय योजनाचा लाभ हा आर्थिक उत्पन्न म्हणून गृहित धरल्याने अहवालातील दावे आभासी तसेच भ्रामक ठरतात.

ह्या पारश्वभूमीवर ढोबळमानाने काहीबाबी बघता वास्तवाचा अंदाज करता येतो. केंद्र शासन महत्त्वाकांक्षी 'अन्नसुरक्षा योजना'डरे देशातील ६७ % म्हणजे ८० कोटी लोकांना धान्याचा मोफत पुरवठा करीत आहे. याचाच अर्थ हे ६७% लोक दारिद्र्यरेषेखालील आहेत, हे सिद्ध होते. दुसरे महत्त्वाचे म्हणजे विविध शासकीय योजनातून मिळालेला आर्थिक लाभ, हा शाश्वत रोजगारातून अथवा व्यवसायातून मिळालेला ठरत नाही. यामुळे शासकीय योजनाचा मिळालेला आर्थिक लाभ उत्पन्न मानणे, हे अर्थशास्त्रीय दृष्टीने चुकीचे ठरते. यातून जागतिक बँकेची आकडेवारी भ्रामक आणि वास्तवाला छेद देणारी ठरते.

अर्थशास्त्राच्या निकषानुसार गरिबीच्या मोजमापासाठी दरडोई उत्पन्न, राहणीमान आणि क्रयशक्ती हेच खात्रीशीर निकष ठरतात. जागतिक बँकेने रोजगारातून मिळणारे उत्पन्न गृहित न धरता वेगळाच निकष लावल्याने भ्रामक आकडेवारी अहवालात प्रतिबिंबीत झाली आहे. जागतिक बँकेने २०२३ चा संदर्भ देत अहवाल प्रसिद्ध केलाय. त्यावर्षी जागतिक बँक व अंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आकडेवारीनुसार भारताचे दरडोई वार्षिक उत्पन्न १ लाख ७२ हजार रुपये इतके होते. याचा अर्थ दरडोई



दैनिक उत्पन्न ४७१ रुपये इतके होते. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत भारत जगात १५३ व्या क्रमांकावर आहे तर शेजारचा बांगलादेश १२५ व्या क्रमांकावर म्हणजेच दरडोई उत्पन्नाबाबत भारताच्या पुढे आहे.

राहणीमान आणि क्रयशक्तीचा विचार केल्यास भारताचे दरडोई उत्पन्न १२ ते १४ हजार इतके असून जागतिक स्तरावर याबाबत भारत १२२ व्या स्थानावर आहे. शेतकऱ्यांचे दरडोई वार्षिक उत्पन्न १ लाख २२ हजार म्हणजे दैनिक उत्पन्न अवघे ३३४ रुपये इतके आहे. जे जागतिक बँकेने ठरविलेल्या दैनिक चारशे रुपये उत्पन्नाच्या निकषापेक्षा कमी आहे. भारतात दरवर्षी सुमारे १६ हजार शेतकरी आत्महत्या होतात. देशाचा बेरोजगारीचा दर ५.५% इतका आहे. देशावर ७ लाख १४ हजार कोटी इतके बाह्य कर्ज आहे. सदरची आकडेवारी जागतिक बँकेच्या अहवालातील आकडेवारी आणि दाव्याचे पितळ उघडे करणारी आहे.

राज्यकर्ते, आयोग, अभ्यासक व अर्थतज्ज्ञ विकास दर (जी.डी.पी.) राष्ट्रीय सकल उत्पन्न अशा मृगजळामागे धावतात. यामुळे आभासी आकडेवारीचा खेळ खेळला जातो. जागतिक बँकेनेही आकडेवारीचा असाच खेळ करून घोळ केला आहे. शासकीय योजनांचा आर्थिक लाभ, तसेच सुमारे १३८ लाख कोटी इतकी अफाट संपत्ती असलेल्या अदानी, अंबानी, टाटा, बिर्ला, जींदाल, मित्तल इत्यादी तीनशे उद्योगपतींचे उत्पन्न देशाच्या जी. डी. पी. मधून वगळून दरडोई उत्पन्न तसेच रोजगार व व्यवसायातून मिळणारे उत्पन्न, राहणीमान व क्रयशक्ती ह्या निकषावर विचार केला , तर वेगळे आणि वास्तववादी चित्र दिसते.जे जागतिक बँकेच्या अहवालाची पोलखोल करणारे आहे.

भारतीय अर्थव्यवस्था जागतिक स्तरावर चौथ्या स्थानावर असली तरी दरडोई उत्पन्नाबाबत १५३ व्या तर राहणीमान व क्रयशक्तीबाबत १२२ व्या स्थानावर आहे,हे जागतिक बँकच सांगते.जर ४९.६ कोटी लोक गरिबीच्या बाहेर आले, तर ८० कोटी लोकांना अन्न सुरक्षा योजनेतून मोफत धान्य कां द्यावे लागते, हा प्रश्नही यनिमित्ताने उपस्थित होतो. अशी वस्तुस्थिती असताना जागतिक बँक भारताच्या गरिबीचा दर ९० टक्क्यापेक्षा अधिक घटल्याचा दावा कसा करते, हे समजत नाही. या सगळ्या विवेचनातून आणि तपशीलातून भारतातील दरडोई उत्पन्न, रोजगार, राहणीमान व क्रयशक्ती याबाबतची वस्तुस्थिती जाणून घेतली, तर गरिबीच्या मोजमापाबद्दलचे भ्रम आणि वास्तव कळते.

रयत शेतकरी संघटनेचे विविध मागण्यांच्या संदर्भात तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : अहिल्यानगर जिल्हा रयत शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर विविध मागण्यांच्या संदर्भात नेवासा तहसीलदार यांना निवेदन दिले असून मागण्याची पूर्तता न झाल्यास रस्त्यावर उतरण्याचा व त्रिव आंदोलन छेडण्याचा ईशारा रयत शेतकरी संघटनेचे जिल्हा संपर्क प्रमुख बाळासाहेब कोरडे पाटील व जिल्हाध्यक्ष बबनराव कोरडे यांनी निवेदनात दिला आहे

याबाबत निवासी नायब तहसिलदार चांगदेव बोरुडे यांना दिलेल्या निवेदनात रयत शेतकरी संघटनेने म्हटले आहे की महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेली आगावू (अजीम) मदत हि अत्यंत तुटपुंजी असून किमान प्रत्येकी वीस हजार रुपयांची मदत देण्यात यावे ही मदत सर्वांना शेतकरी, शेतमजुर, कष्टकरी, मेंढपाळ, मच्छीमार करणारे इतर अकुशल कामगार, गांधकाम कामगार, यांना देण्यात यावी,जिल्हातील साखर कारखानदार यांनी उसाचा अग्रीम हप्ता जाहीर न करता उसतोड चालु केली असून शेतकऱ्यांना पहिला हप्ता प्रतिटन किमान चार हजार रुपये देण्यात यावे, उसतोड मजूर व वाहतुकदार यांच्या मजुरीत वाढ करण्यात यावी.

प्रत्येक गावात रोजगार हमी योजनेतुन जल संधारणाची व शिवपानंद रस्याची कामे उपलब्ध करुन द्यावी जे- ने करुन रोजगार उपलब्ध होईल,जिल्हा व तालुक्यातील मायक्रो फायनांन्स कंपनीकडुन घेतलेल्या कर्जाच्या वसुलीस दुष्काळ जण्य परीस्थीती संपुपर्यंत जाचक वसुली थांबवण्यात यावी,जाचक वसुली थांबलेली नाही असे आढळल्यास किवा तक्रार केल्यास आपण योग्य ती कारवाई करावी.

शेतकऱ्यांनी जिल्हा व नॅशनल बँकेकडून घेतलेली पिक कर्ज व मध्यम मुदत कर्जाचे पुर्णपणे व्याज माफ करण्यात यावे तसेच फायनांन्स कंपनी कडुन घेतलेले ट्रॅक्टर व इतर वाहने त्यांच्या वसुलीस किमान दोन वर्ष स्थगीती देण्यात यावी व व्याज माफ व्हावे,. उपलब्ध पाणी साठा आहे त्यातुन चारा पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना दिवसा पुर्ण दाबाने विज पुरवठा करण्यात यावा यासह पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात बारा मागण्यांचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे

रयत शेतकरी संघटनेच्या मागण्यांची पूर्तता प्रशासनाने न केल्यास त्रिव आंदोलन छेडण्याचा ईशारा रयत शेतकरी संघटनेचे अहिल्यानगर जिल्हा संपर्क प्रमुख बाळासाहेब येडू कोरडे पाटील,जिल्हाध्यक्ष बबनराव कोरडे पाटील, ओबीसी जिल्हाध्यक्ष गणेश सोनवणे, उत्तर जिल्हा प्रमुख विशाल वरकड,मारुती मुरदरे,तालुका सचिव अर्जुन वरखडे यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.



पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव आमच्याच काळात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : शहरातील पाणीटंचाई आणि साठवण तलावाच्या रखडलेल्या कामावरून सुरू असलेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांत आता सुधारित पाणीपुरवठा योजनेच्या श्रेयाचा मुद्दा पुढे आला आहे. या योजनेचा प्रस्ताव माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक यांच्या कार्यकाळातच राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी श्रेयासाठी जनतेची दिशाभूल करू नये, असा पलटवार राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष तोफिक शेख यांनी केला आहे. शहरातील पाणीप्रश्नावर सत्ताधाऱ्यांकडून होत असलेल्या आरोपांना उत्तर देताना शेख यांनी प्रसिद्धीपत्रकाडरे आपली भूमिका मांडली. वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन आदिक यांच्या कार्यकाळात सुधारित पाणीपुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला होता. या योजनेला मंजुरी मिळावी यासाठी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. कोरोना काळामुळे विकासकामांना विलंब झाला; मात्र त्यानंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून योजनेला मंजुरी मिळाल्याचा दावा शेख यांनी केला.

अनुराधा आदिक यांच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी नियोजन करण्यात आले होते. सण-उत्सवांच्या दिवशीही पाणी मिळावे, यासाठी विशेष काळजी घेतली जात होती, असेही त्यांनी नमूद केले. सध्या साठवण तलावाचे काम संथ गतीने सुरू असून, मुरुमामुळे कामात अडथळे येत असल्याची चर्चा आहे. कामातील विलंब झाकण्यासाठी विरोधकांवर आरोप करण्याऐवजी सत्ताधाऱ्यांनी रखडलेली कामे पूर्ण करावीत, असे शेख म्हणाले. पाणीपुरवठ्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असताना पाणी वितरणाच्या वाहनांवर व्यक्तींची नावे झळकवून श्रेय घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याची टीकाही त्यांनी केली. दरम्यान, अनुराधा आदिक यांनी ११ फेब्रुवारी २०२१ रोजी तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून १०७ कोटी १८ लाख रुपयांच्या सुधारित पाणीपुरवठा योजनेसाठी नगरोत्थान अभियानांतर्गत अनुदानाची मागणी केली होती. या पत्राचा दाखला देत योजनेचा प्रस्ताव तत्कालीन नगरपरिषदेच्या काळातच सादर झाल्याचे शेख यांनी स्पष्ट केले.

दुष्काळात दुग्ध व्यवसाय टिकविण्यासाठी चारा व आहाराचे नियोजन महत्त्वाचे : डॉ. प्रशांत बोडके

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : चारा टंचाई आणि दुष्काळी परिस्थितीत दुग्ध व्यवसाय टिकविण्यासाठी जनावरांच्या आहाराचे योग्य नियोजन, उपलब्ध चाऱ्याचा काटकसरीने वापर आणि मुरघास निर्मितीवर भर देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी केले. निमगाव घाणा येथील प्रियदर्शनी डेअरी प्रा. लि. संचलित दुर्गेश्वरी दूध संकलन व शीतकरण केंद्रात दीपावलीनिमित्त दूध उत्पादक शेतकरी मेळावा, बोनस वाटप आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या पत्नींचा सन्मान सोहळा उत्साहात झाला. यावेळी डॉ. बोडके बोलत होते. सहयोगी संशोधन संचालक डॉ. बाळासाहेब पाटील उपस्थित होते. गोसंशोधन व विकास प्रकल्पाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. समीर ढगे यांनी वर्षभराचे आहार नियोजन, चारा व्यवस्थापन, मुरघास निर्मिती व त्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. पशुवैद्यकीय शास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रमोद साखरे यांनी जनावरांमधील तापाचे आजार, स्तनदाह आणि त्यावरील उपचार व प्रतिबंधात्मक उपायांची माहिती दिली. डॉ. बाळासाहेब पाटील यांनी गुणवत्तापूर्ण दूध उत्पादन आणि दूध प्रक्रियेचे महत्त्व विशद केले. डॉ. बोडके यांनी गोपालनाचे शेतीतील महत्त्व स्पष्ट करताना शेणाचा नैसर्गिक, सेंद्रिय व विषमुक्त शेतीसाठी उपयोग होतो. त्यामुळे गोपालनाकडे केवळ दूध उत्पादनाचा व्यवसाय म्हणून न पाहता शेतीचे आरोग्य जपण्याचे साधन म्हणून पाहावे,



असे आवाहन केले. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाचे उपक्रम सुरू असून शेतकऱ्यांनी विद्यापीठाच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असेही ते म्हणाले.यावेळी गोपालकांचा सन्मान करून बोनसचे वाटप करण्यात आले. सुभाष रुपनर, सतीश रुपनर, विकास रुपनर व अक्षय रुपनर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. परिसरातील दूध उत्पादक शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपत्कालीन परिस्थितीत केलेली मदत नवजीवन देऊ शकते : डॉ. मोहसीन तांबोळी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : अपघात, हृदयविकाराचा झटका किंवा अचानक उद्भवलेल्या वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत पहिल्या काही मिनिटांत मिळालेली योग्य मदत एखाद्या व्यक्तीला नवजीवन देऊ शकते. त्यामुळे सीपीआर (हृदय पुनरुज्जीवन) या जीवनरक्षक तंत्राचे ज्ञान केवळ वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींनाच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाला असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पायरेन्स आयबीएमएचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आपत्ती व्यवस्थापनविषयक मार्गदर्शक सूचनांनुसार पायरेन्स आयबीएमए, लोणी येथे सीपीआर व प्रथमोपचार प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींच्या वेळी सुरक्षितता, बचावकार्य आणि जीवनरक्षक कौशल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, हा या उपक्रमाचा उद्देश होता.

पायरेन्स संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील यांच्या संकल्पनेतून तसेच संस्थेचे सचिव व संचालक डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली



हा उपक्रम राबविण्यात आला. या प्रशिक्षणासाठी विखे पाटील फाउंडेशन, अहिल्यानगर येथील जीवनरक्षक प्रशिक्षण पथकातील डॉ. शितल जयकर, डॉ. तृषा क्षीरसागर, डॉ. अभिजय नायर, डॉ. अक्षता सोमणकर आणि तंत्रज्ञ विलास पवार यांनी मार्गदर्शन केले. हृदयक्रिया बंद पडल्याची लक्षणे ओळखणे, सीपीआरची आवश्यकता, छातीवर दाब देण्याची योग्य पद्धत, आपत्कालीन मदत बोलावणे आणि वैद्यकीय मदत मिळेपर्यंत रुग्णाला प्राथमिक जीवनरक्षक मदत देणे, याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. प्रशिक्षणामध्ये केवळ सैद्धांतिक माहिती न देता प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांवर भर देण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांना सीपीआरची प्रक्रिया कृतीतून समजून घेता आली. आपत्कालीन परिस्थितीत घाबरून न जाता प्रसंगावधान राखून योग्य मदत करणे किती महत्त्वाचे आहे, याची जाणीवही या प्रशिक्षणातून करून देण्यात आली.

शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदनशीलता, सेवाभाव आणि संकटसमयी मदतीसाठी पुढाकार घेण्याची वृत्ती विकसित व्हावी, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. यावेळी डॉ. विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक हॉस्पिटल व महाविद्यालयाचे प्राचार्य तथा वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रदीपकुमार जोंधळे, पायरेन्स आयबीएमएचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्हा बँकेत सुजय पर्वाचा उदय

विखे घराण्याची सहकारातील चार पिढ्यांची परंपरा

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी :अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत डॉ. सुजय विखे यांचा प्रवेश झाल्याने जिल्हा बँकेत सुजय पर्वाचा उदय झाला असून हा केवळ एका व्यक्तीचा प्रवेश नसून विखे परिवाराच्या चार पिढ्यांच्या सहकार परंपरेचा नवा अध्याय आहे. सहकाराची खरी मुहूर्तमेढ रोवली ती पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी. आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना त्यांनी १९४८ साली प्रवरानगर येथे उभा केला आणि महाराष्ट्राच्या सहकार चळवळीला दिशा दिली.



त्याच विचारातून जिल्हा बँक, सेवा संस्था आणि सहकारी संस्थांचे मोठे जाळे उभे राहिले आणि सहकारावर विखे परिवाराची विशेष पकड निर्माण झाली जी आजतागायत कायम आहे.

या पकडीला राजकीय बळ मिळाले ते श्रीरामपूर तालुक्यातून. पद्मश्री विठ्ठलराव यांच्यानंतर ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी श्रीरामपूर तालुक्यातून जिल्हा बँकेच्या राजकारणात प्रवेश केला. सुरुवातीला त्यांना संचालक म्हणून संधी मिळाली, त्यानंतर ते बँकेचे उपाध्यक्ष झाले आणि पुढे अध्यक्षपदाचा बहुमानही त्यांना मिळाला. त्यांच्या कार्यकाळाला जिल्हा बँकेचा सुवर्णकाळ म्हटले जाते कारण त्यांनी शेतकऱ्यांसाठी अर्थसहाय्यावर केवळ सहा टक्के व्याजदराचा पॅटर्न लागू केला. हा निर्णय संपूर्ण राज्यात गाजला, त्याची नोंद घेतली गेली आणि इतर जिल्हा बँकांनी तो आदर्श म्हणून स्वीकारला. यामुळेच अहमदनगर जिल्हा बँकेची राज्यात एक वेगळी आणि आदर्श बँक म्हणून ओळख निर्माण झाली.

या संपूर्ण प्रवासात एक उल्लेखनीय अपवाद ठरले ते पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील. त्यांनी स्वतः कधीही जिल्हा बँकेची निवडणूक लढवली नाही. त्याऐवजी त्यांनी आपले विश्वासू सहकारी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के यांना सातत्याने मैदानात उतरवले. प्रत्यक्ष निवडणूक न लढवताही बँकेच्या राजकारणावर आणि जिल्ह्याच्या सहकारावर त्यांचा वरचष्मा आणि दबदबा कायम राहिला. पडद्यामागून राजकारणाचे सूत्रे हलवून वर्चस्व टिकवण्याची ही रणनीती विखे घराण्याच्या राजकीय कौशल्याचे प्रतीक मानली जाते.ता याच परंपरेला पुढे नेत डॉ. सुजय विखे पाटील यांच्या रूपाने विखे परिवाराच्या चौथ्या पिढीने जिल्हा बँकेच्या राजकारणात अधिकृत प्रवेश केला असून सुजय पर्वाची सुरुवात झाली आहे.

हैदराबादला जाणाऱ्या महिलेची १५ लाखांची पर्स लंपास

फोनपे ने अदा केलेल्या बिलावरून आरोपीचा शोध ,शिर्डी पोलिसांची तत्परता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी - हैदराबादकडे प्रवासासाठी आलेल्या ६५ वर्षीय वृद्ध महिलेची साडे दहा तोळे सोने आणि रोख रक्कम असलेली पर्स एका हॉटेलमध्ये चोरीला गेल्याची घटना शिर्डीत घडली. शिर्डी पोलिसांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे अवघ्या काही तासातच १५ लाख रुपयांचा मुद्देमाल सुखरूप परत मिळवण्यात आला आहे.

संगमनेर येथील रहिवासी सरोजिनी कांगणे (वय ६५) या हैदराबादला जाण्यासाठी शिर्डीत आल्या होत्या. बसमार्गे हैदराबादला जायचे असल्याने त्या बसची प्रतीक्षा करत असताना शहरातील एका हॉटेलमध्ये नाश्त्यासाठी थांबल्या होत्या.

नाश्ता करून काउंटरवर पैसे देत असताना गर्दीचा फायदा घेत एका अनोळखी महिलेने त्यांची पर्स हातोहात लांबवली. या पर्समध्ये साडे दहा तोळे सोन्याचे दागिने आणि १६ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण सुमारे १५ लाख रुपयांचा ऐवज होता. काही



वेळानंतर पर्स गायब असल्याचे लक्षात येताच कांगणे यांच्या पायाखालची जमीनच सरकली.

घाबरलेल्या अवस्थेत त्यांनी तातडीने आपल्या मुलाला फोन करून घडलेला प्रकार सांगितला. मुलाने तात्काळ आपला शिर्डीतील मित्र विकास गोंदकर याला सदर घटनेची माहिती दिली. विकास गोंदकर यांनी घटनास्थळ गाठून कांगणे यांना धीर दिला आणि त्यांना थेट शिर्डी पोलीस ठाण्यात नेले.

शिर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस कॉन्स्टेबल केवलसिंग राजपूत, सुनील दिघे आणि भोसले यांना तात्काळ तपासाचे आदेश दिले.

पोलिसांनी हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, पर्स चोरणारी महिला हैदराबादकडे जाणाऱ्या एका खासगी बसमध्ये बसून निघून गेल्याचे स्पष्ट झाले. ती महिला केवळ जेवणासाठी थांबली असल्याने तिचा शोध घेणे मोठे आव्हान होते.

मात्र पोलिसांनी चाणाक्षपणे तपास करत, संबंधित महिलेने हॉटेलचे बिल फोनपे डरे अदा केल्याचे निदर्शनास आले. त्या व्यवहारावरून मिळालेल्या मोबाईल नंबरचे लोकेशन ट्रॅक करण्यात आले.

त्यानंतर पोलिसांनी हैदराबादकडे जाणाऱ्या बसच्या मालकाशी संपर्क साधला. रात्री बारा वाजण्याच्या सुमारास ती बस अहिल्यानगर येथील एका हॉटेलवर जेवणासाठी थांबली असताना, शिर्डी पोलिसांच्या पथकाने आणि विकास गोंदकर यांनी तेथे धाव घेऊन बसची कसून तपासणी केली. तपासाअंती चोरट्या महिलेकडून सरोजिनी कांगणे यांची पर्स जप्त करण्यात आली.

शिर्डी पोलीस ठाण्यात सर्व मुद्देमाल सरोजिनी कांगणे यांच्या ताब्यात देण्यात आला. तब्बल १५ लाखांचा ऐवज परत मिळाल्याने त्यांना अश्रू अनावर झाले.

''शिर्डीत साईबाबा आजही आहेत आणि त्यांचे देवदूत माझ्यासाठी धावून आले,'' अशा भावुक शब्दात त्यांनी पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे आणि सामाजिक कार्यकर्ते विकास गोंडकर यांचे आभार मानले.

वाकडीत साखळी बंधाऱ्यांचे जलपूजन

आ. लंघे यांनी मांडला विकासकामांचा लेखाजोखा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील वाकडी येथे साखळी बंधाऱ्यांमध्ये पूर्ण क्षमतेने साठविण्यात आलेल्या पाण्याचे जलपूजन आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आ. विठ्ठलराव लंघे यांनी गावासाठी उपलब्ध करून दिलेल्या विविध विकासनिधीचा आणि मंजूर विकासकामांचा लेखाजोखा ग्रामस्थांसमोर मांडला. जिल्हा परिषद निधीपासून साखळी बंधारे, सभामंडप, गावातील प्रमुख रस्ते तसेच बंद पडलेली जलजीवन योजना पुन्हा सुरू करण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याची माहिती त्यांनी दिली.

वाकडी गावातील विकासकामांचा उल्लेख करताना आ. लंघे यांनी जिल्हा परिषद निधीतून झालेली कामे, साखळी बंधारे, सभामंडप आणि गावातील प्रमुख रस्त्यांचा तपशीलवार आढावा घेतला. प्रत्येक रस्त्याच्या कामाचे स्वरूप आणि विकासकामांचे नियोजन त्यांनी ग्रामस्थांसमोर मांडले.

गावातील बंद पडलेली जलजीवन योजना पुन्हा सुरू करण्यासाठी आपण पाठपुरावा करीत असून बारा गावांच्या पाणीपुरवठा योजनेचा प्रश्नही मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे आमदारांनी सांगितले. तालुक्यातील विकासकामांचा वेग



यापुढेही कायम राहील. विशेषतः धरणग्रस्त पट्ट्यातील गावांच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी नमूद केले. जलपूजन कार्यक्रमाच्या निमित्ताने पाणी वापर संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे चेअरमन तुकाराम गायकवाड, प्राचार्य, रोहिदास काळे, भाई चेअरमन तसेच पाट कर्मचाऱ्यांचाही सन्मान करण्यात आला. ग्रामपंचायत आणि सोसायटीच्या वतीने आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक शिक्षक बँकेचे माजी संचालक पांडुरंग काळे यांनी केले. त्यांनी गावात झालेल्या विविध विकासकामांची माहिती देत लोक प्रतिनिधींसमोर कामांचा आढावा मांडला.

अजय काळे यांनी उल्लेखं 'पाणीदार आमदार' असा केला. सर्वसामान्य नागरिकांना सहज उपलब्ध होणारे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली असल्याचे सांगताना, 'हात दाखवा आणि गाडी थांबवा, केव्हाही फोन करा, आमदार तत्पर हजर असतात,' अशा शब्दांत त्यांनी आमदारांच्या जनसंपर्काचा उल्लेख केला. या कार्यक्रमास किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष अंकुश काळे,भाऊसाहेब काळे, संभाजी काळे, सुखदेव काळे गुरुजी, रोहिदास काळे, संतुभाऊ गायकवाड रमेश काळे, पांडुरंग गायकवाड, संतोष कराळे, न्यायमद शेख, भाऊसाहेब काळे, सोपान काळे, राजेंद्र काळे, मदन नजन, दादासाहेब काळे, बाबुराव काळे यांच्यासह गोभक्त जाधव परिवार, पाटील परिवार, काळे परिवार, गायकवाड परिवार तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि तरुण मंडळांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

द•ख•ल

म.ल.हिवरे कॅनालला वेड्या बाभळीचा विळखा



चांदा : नेवासा तालुक्यातील महालक्ष्मी हिवरे येथील कॅनालला वेड्या बाभळीचा विळखा असून या वाढलेल्या वेड्या बाभळीचे अतिक्रमण काढावे अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी केली आहे. या बाबत सविस्तर वृत्त असे की महालक्ष्मी हिवरे येथील हिवरे माका या रस्त्यावरील बेलाच्या झाडा कडे जाणारा जो कॅनाल आहे त्या कॅनाल वरील रस्त्यात वेड्या बाभळीचे अतिक्रमण वाढले आहे ते काढावे अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी केली आहे कारण त्या वेड्या बाभळी मुळे तेथून टू व्हीलर गाडीवर जायचे असेल तर खूपच अडचण अचानक एखादा जंगली प्राणी किंवा सरपटणारे मोठे प्राणी आडवे आले तर मागे आड आणि पुढे विहिर या म्हणी प्रमाणे टू व्हीलर किंवा पादचारी व्यक्तीची होऊ शकते आणि त्याच्या जिवावर ही हा प्रसंग भव्यीषात येऊ शकतो ? तसेच या परिसरातील अनेक शेतकरी बेलाच्या झाडा जवळील महादेवाच्या मंदिरात दर्शनासाठी जातात पण जिव मुठीत धरूनच जावे लागते तसेच अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी कॅनाल लगत असल्याने त्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी हाच रस्ता असल्याने ते देखील जीव मुठीत धरून या ठिकाणाहून जातात तरी संबंधित विभागाने कॅनाल वरील काट्याचे अतिक्रमण काढून शेतकऱ्यांसाठी हा कॅनाल वरील रस्ता मोकळा करावा अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांनी केली आहे.

कृषी महाविद्यालय, सोनईच्या रासेयो कार्याचा विद्यापीठाकडून गौरव



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिंगणापूर : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विद्यापीठ सल्लागार समितीच्या ३३ व ३४ व्या बैठकीत कृषी महाविद्यालय, सोनईच्या सामाजिक कार्याची दखल घेत महाविद्यालयाचा विशेष गौरव करण्यात आला. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. हरी मोरे आणि विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप तांबे यांचा सन्मान करण्यात आला. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निवडणूक कामातील योगदानाबद्दल महाविद्यालयाला २०२४ चा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार मिळाला आहे. तसेच डॉ. तांबे यांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तीन वर्षे उत्कृष्ट रासेयो कार्यक्रम अधिकारी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. मुळा एज्युकेशनचे उपाध्यक्ष उदयन गडाख यांच्या प्रेरणेने तसेच प्राचार्य डॉ. मोरे व उपप्राचार्य प्रा. सुनील बोरूडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. नवमतदार नोंदणी, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, रक्तदान, व्यसनमुक्ती, रस्ता सुरक्षा आणि पथनाट्याद्वारे जनजागृती असे उपक्रम त्यात समाविष्ट आहेत. 'राष्ट्रीय सेवा योजना हे केवळ शिबिर नसून संस्कार आहेत,' असे मत कुलगुरू डॉ. खर्चे यांनी व्यक्त केले. बैठकीस विद्यापीठाचे अधिष्ठाता, कुलसचिव, अधिकारी तसेच संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य व रासेयो कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.

श्रीरामपूरमधील दोन बीओटी प्रकल्प संशयाच्या भोवऱ्यात

उच्चस्तरीय चौकशी व फौजदारी कारवाईची राजेंद्र देवकर यांची मागणी

गेस्ट हाऊस इमारतीचे रखडलेले काम आणि व्यापारी संकुलातील गाळे वाटपावर आक्षेप



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : पंचायत समिती आणि जिल्हा परिषद मालकीच्या जागांवरील दोन बीओटी प्रकल्पांमधील कथित अनियमिततेवरून जिल्हा परिषद प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. गेस्ट हाऊस परिसरातील अपूर्ण इमारत बांधकाम आणि हनुमान मंदिर परिसरातील व्यापारी संकुलाच्या करारासह गाळे वाटप प्रक्रियेची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख राजेंद्र पाटील देवकर यांनी केली आहे.

जिल्हा परिषद गेस्ट हाऊस परिसरातील बीओटी इमारतीचे बांधकाम २०२२ मध्ये सुरू झाले. करारानुसार २०२४ पर्यंत काम पूर्ण करून इमारत जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित होणे अपेक्षित होते.

मात्र, मुदत संपूनही काम अपूर्ण असल्याचा आरोप देवकर यांनी केला. निविदा प्रक्रिया पारदर्शक होती का, एकाच ठेकेदाराला काम कसे मिळाले आणि ३० वर्षांसाठी प्रतिचौरस मीटर १०० रुपये दराने जागा देण्याच्या व्यवहारात शासनाचे आर्थिक हित जपले गेले का, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली.

हनुमान मंदिर परिसरातील व्यापारी संकुलाची जागा कमी दराने भाडेपट्ट्याने दिल्याचा दावा करत कराराची माहिती सार्वजनिक करण्याची मागणीही त्यांनी केली. बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेतल्यानंतरच गाळे वाटप करावे. वर्तमानपत्रे व डिजिटल माध्यमांतून जाहिरात देऊन बाजारभावानुसार भाडे निश्चित करावे, असे त्यांनी म्हटले आहे.

दोन्ही प्रकरणांत प्रत्यक्ष स्थळपाहणी, करारपत्रांची तपासणी व आर्थिक लेखापरीक्षण करून दोषी अधिकारी आणि ठेकेदारांवर फौजदारी कारवाई करावी. मागण्यांची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देवकर यांनी दिला आहे.

चेहऱ्याच्या गंभीर फ्रॅक्चरवर तीन यशस्वी शस्त्रक्रिया

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : चेहऱ्याला झालेली गंभीर दुखापत ही केवळ बाह्य स्वरूपापुरती मर्यादित नसते. अशा दुखापतींमुळे बोलणे, अन्न चावणे, जबड्याची हालचाल आणि चेहऱ्याच्या नैसर्गिक रचनेवरही परिणाम होऊ शकतो. अशाच गुंतागुंतीच्या दुखापतींवर मात करण्यासाठी डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल व वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथील प्लास्टिक सर्जरी विभागाने तीन रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत. विशेष म्हणजे, या तिन्ही रुग्णांना आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचारांचा लाभ मिळाला. या तीन रुग्णांच्या दुखापतींचे स्वरूप वेगवेगळे होते. पहिल्या रुग्णाच्या चेहऱ्याच्या उजव्या बाजूच्या वरच्या जबड्याचे, खालच्या जबड्याचे आणि गालाच्या हाडाचे फ्रॅक्चर झाले होते. दुसऱ्या रुग्णाच्या खालच्या जबड्याचे, तर तिसऱ्या रुग्णाच्या गालाच्या हाडाचे फ्रॅक्चर झाले होते. प्रत्येक रुग्णाच्या दुखापतीचे स्वरूप, हाडांची स्थिती आणि संभाव्य गुंतागुंत लक्षात घेऊन डॉक्टरांनी स्वतंत्र शस्त्रक्रिया नियोजन केले. या शस्त्रक्रियांसाठी ओरीफ (ओपन रिडक्शन अँड इंटरनॅशनल फिक्सेशन) या आधुनिक पद्धतीचा वापर करण्यात आला.

या तंत्रामध्ये फ्रॅक्चर झालेली हाडे योग्य स्थितीत आणून विशेष वैद्यकीय प्लेट्स आणि स्क्रूच्या साहाय्याने स्थिर केली जातात. यामुळे हाडांची योग्य जुळणी होण्यास मदत होते. चेहऱ्याची नैसर्गिक रचना, दातांची जुळणी आणि जबड्याची कार्यक्षमता पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने ही उपचारपद्धती महत्त्वाची ठरते. प्लास्टिक सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. अजित काळे, तसेच डॉ. धीरज जुमडे आणि डॉ. अश्विन वानखेडे यांनी या शस्त्रक्रियांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. चेहऱ्याच्या विविध हाडांना झालेल्या दुखापतींवर अचूक उपचार करताना वैद्यकीय कौशल्यासोबतच सूक्ष्म शस्त्रक्रिया नियोजनाची आवश्यकता असते. डॉक्टरांच्या समन्वयातून तिन्ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. चेहऱ्याच्या हाडांच्या गुंतागुंतीच्या फ्रॅक्चरवर शस्त्रक्रिया करताना विशेष उपकरणे, वैद्यकीय साहित्य आणि तज्ज्ञ डॉक्टरांची आवश्यकता असते. मात्र, या तिन्ही रुग्णांवर आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामुळे रुग्णांना आवश्यक आधुनिक उपचार मिळण्याबरोबरच उपचारांच्या खर्चातूनही दिलासा मिळाला.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे अध्यक्ष नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने आणि वैद्यकीय संचालक डॉ. अभिजीत दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयात विशेष वैद्यकीय सेवांच्या बळकटीकरणावर भर दिला जात आहे. चेहऱ्याच्या गंभीर दुखापतींवर अत्याधुनिक शस्त्रक्रिया सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणे ही अहिल्यानगर आणि परिसरातील रुग्णांसाठी दिलासादायक बाब आहे. प्लास्टिक सर्जरी विभागाच्या या यशस्वी शस्त्रक्रियांमुळे गुंतागुंतीच्या चेहऱ्याच्या फ्रॅक्चरवरील तज्ज्ञ उपचार रुग्णालयात उपलब्ध असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

गौतम बँकेच्या सभासदांना दिवाळीपूर्वीच ३८.७९ लाखांच्या लाभांशाचे वाटप : आ. आशुतोष काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



कोळपेवाडी : कोपरगाव परिसरातील शेतकरी, कष्टकरी आणि शेतमजुरांच्या आर्थिक उन्नतीसाठी मा.खा.स्व.कर्मवीर शंकररावजी काळे यांनी सहकाराच्या माध्यमातून विविध संस्था उभारून सर्वसामान्यांच्या प्रगतीचा भक्कम पाया रचला. या संस्थांना पोटच्या लेकराप्रमाणे जपत त्यांनी सहकार चळवळीला लोकाभिमुख दिशा दिली. त्याच विचारधारेतून स्थापन झालेल्या गौतम सहकारी बँकेने उत्कृष्ट व पारदर्शक कारभाराच्या बळावर सभासदांचा विश्वास संपादन करत आर्थिक प्रगतीची परंपरा कायम राखली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये बँकेने मिळविलेल्या नफ्याचा लाभ सभासदांपर्यंत पोहोचवितांना ३८ लाख ७९ हजार ३६३ रुपयांचा लाभांश दिवाळीपूर्वीच मंगळवार (दि.३) रोजी सभासदांच्या बँक खात्यात थेट जमा केला असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले आहे.

सहकारी संस्था या खऱ्या अर्थाने सभासदांच्या हक्काच्या असतात.या संस्था काटकसरीने कशा चालवायच्या आणि सभासदांचे हित कसे जपायचे याचा आदर्श वस्तुपाठ मा.खा.स्व.कर्मवीर शंकररावजी काळे यांनी घालून दिला आहे. त्यांच्या आदर्श विचारांवर व माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व उद्योग समुहातील सर्व संलग्न सहकारी संस्थांची वाटचाल सुरु असून गौतम बँक देखील प्रगतीच्या दिशेने घौडदौड करीत आहे.

त्यामुळे दरवर्षी दिवाळीच्या काळात सर्व सभासदांना लाभांश दिला जात असल्यामुळे याहीवर्षी गौतम बँकेच्या सर्व सभासदांना दिवाळीपूर्वी लाभांश देण्यात आला आहे. बदलत्या काळानुसार बदल करून गौतम बँकेने अत्याधुनिक बँकिंग प्रणाली स्वीकारली आहे. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकेच्या बरोबरीने ग्राहकांना सेवा पुरविल्या जात आहेत.नागरिकांच्या कष्टाच्या पैशाची सुरक्षितता जपण्यासोबतच संस्थेची उत्तरोत्तर प्रगती साधणे हेच मुख्य उद्दिष्ट असल्यामुळे योग्य कर्जवाटप, वसुली आणि प्रशासकीय शिस्त यामुळेच बँक सातत्याने नफ्यात राहून सभासदांना लाभांश देणे शक्य झाले असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी म्हटले आहे.

बँकेचे चेअरमन संजय आगवण,व्हा.चेअरमन विजय रक्ताटे व त्यांचे संचालक मंडळ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण पावडे,प्रशासकीय अधिकारी बापूसाहेब घेमुड व त्यांचे सहकारी कर्मचारी करीत असलेल्या नियोजनबद्ध कारभाराचे आ.आशुतोष काळे यांनी कौतुक केले आहे. सर्व सभासदांच्या खात्यात लाभांशाची रक्कम वेळीच जमा करून दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर दिवाळीपूर्वीच थेट खात्यात लाभांश जमा झाल्याने सभासदांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण पसरले असून सभासदांकडून आभार व्यक्त केले जात आहे.

कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर नेवासा तालुक्यातील रस्ते विकासाला ५८.६० कोटींची मंजुरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



नेवासा : सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर नेवासा तालुक्यातील रस्ते विकास आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश आले असून नेवासा तालुक्यातील चार महत्त्वपूर्ण रस्ते विकासकामांना तब्बल ५८ कोटी ६० लाख रुपयांची प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

मंजूर झालेल्या विकासकामांमध्ये रामार्ग ६६ ते शनी शिंगणापूर ते कांगोणी रस्ता सुधारण्यासाठी ७ कोटी ८४ लाख रुपये, सोनई-घोडेगाव-कुकाणा (रामार्ग ६६) रस्ता सुधारणा व लहान पुलाच्या बांधकामासाठी १३ कोटी १६ लाख रुपये, सोनई-कांगोणी ते अहिल्यानगर-संभाजीनगर रस्ता (प्र.जि.मा. १८९) मजबुतीकरणासाठी २१ कोटी ९७ लाख रुपये, तर कांगोणी-खरवंडी आणि खरवंडी-वडाळा बहिरोबा रस्ता सुधारणेसाठी १५ कोटी ६३ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राज्यभरातून भाविकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा होण्याची शक्यता लक्षात घेता या रस्त्यांचे महत्त्व अधिक वाढले आहे.

या कामांमुळे नेवासा तालुक्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होणार असून ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, व्यापारी तसेच भाविकांच्या प्रवासाचा मार्ग अधिक सुकर होण्यास मदत होणार आहे.

कुंभमेळ्याच्या निमित्ताने नेवासा तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्याच्या दृष्टीने ही मंजुरी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या प्रयत्नांतून मंजूर झालेली ही विकासकामे तालुक्याच्या प्रगतीच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याने नागरिक समाधान व्यक्त करतांना दिसत आहे

CHANGE OF NAME
I Have Change
My Daughter Birth
Certificate In Old Name
Dhembre Roshan Ashok
(Educational Documents)
(Before Name)
To New Name As
Roshan Ashok Dhemare
(Aadhaar No.Mother-
4521-8336-9272)
From Vide Affidavit Before
Notary Public Kopargaon
Place : Kopargaon
Date : 04/11/2026

बोनस, ऊसबिल अन् शासकीय मदतीने कोळपेवाडीत दिवाळी खरेदीला झळाळी

किराणा, कपडे, फटाके अन् सुवर्ण खरेदीने बाजारपेठेत उत्साह

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : यंदा एल निनोच्या प्रभावामुळे मॉन्सूनचे प्रमाण कमी राहिल्याने खरीप हंगामातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला मोठा फटका बसला. सर्वत्र दुष्काळी परिस्थिती असल्याने दिवाळीच्या खरेदीवर मंदीचे सावट पसरण्याची शक्यता होती. मात्र, विविध माध्यमांतून शेतकरी, महिला आणि कर्मचाऱ्यांच्या हातात आलेल्या पैशामुळे कोळपेवाडी परिसरातील बाजारपेठेत दिवाळी खरेदीला चांगला प्रतिसाद मिळत असून व्यापाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याने कर्मचाऱ्यांना दिलेला जवळपास साडेपाच कोटी रुपयांचा बोनस आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलेल्या वाढीव ऊसबिलामुळे बाजारपेठेला आर्थिक बळ मिळाले आहे. सन २०२५-२६ च्या गळीत हंगामातील ऊसाला यापूर्वी प्रतिमेट्रिक टन ३,१०० रुपये दिल्यानंतर कारखान्याने कार्यक्षेत्रातील ऊसाला प्रतिमेट्रिक टन १५० रुपये वाढ आणि ५० रुपये प्रोत्साहनपर अनुदान असे एकूण २०० रुपये वाढीव ऊसबिल दसऱ्याच्या दुसऱ्याच दिवशी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले.

त्यामुळे सणासुदीच्या काळात शेतकरी व कर्मचाऱ्यांच्या हातात अतिरिक्त पैसा उपलब्ध झाला. याशिवाय विविध शासकीय योजनांच्या आर्थिक लाभाच्या योजनांचा पात्र कुटुंबांना आर्थिक आधार मिळाला आहे. या रक्कमांचा विनियोग दिवाळीच्या खरेदीसाठी होत असल्याने किराणा, कपडे, घरगुती वस्तू आणि सोने-चांदीच्या बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ वाढली असून सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. दुष्काळी परिस्थिती असूनही आर्थिक मदतीचे विविध स्रोत, वाढीव ऊसबिल आणि सोन्याच्या दरातील घसरण यांचा एकत्रित परिणाम दिवाळीच्या खरेदीवर दिसून येत आहे. त्यामुळे कोपरगाव परिसरातील बाजारपेठेत सणाचा उत्साह कायम असून स्थानिक व्यापाराला दिलासा मिळाला आहे.

> सोन्याच्या दरात झालेल्या घसरणीचा ग्राहकांना फायदा होत असून दिवाळीच्या दागिने खरेदीला चालना मिळाली आहे. विविध माध्यमातून नागरीकांच्या हातात सणासाठी पैसा उपलब्ध झाला आहे. विशेषतः कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याने कर्मचाऱ्यांना दिलेला बोनस आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलेल्या वाढीव ऊसबिलामुळे परिसरातील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल वाढली आहे. शेतकरी व कर्मचाऱ्यांच्या खरेदीमुळे स्थानिक व्यापाऱ्यांना मोठा आर्थिक फायदा होत असून दिवाळीच्या व्यवसायाला चांगली चालना मिळाली आहे.
>
> **गणेश घाडगे (संचालक, लक्ष्मी ज्वेलर्स.)**

> दुष्काळामुळे यंदा दिवाळीच्या खरेदीवर परिणाम होईल, अशी भीती होती. मात्र,कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचा बोनस व वाढीव ऊसबिल, तसेच लाडकी बहीण, दुष्काळी अनुदान आणि नमो शेतकरी योजनेतून मिळालेल्या रकमेमुळे ग्राहकांच्या हातात पैसा उपलब्ध झाला आहे. किराणा खरेदीसाठी ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण आहे.
>
> **धनेश भळगट (महावीर 'डी मार्ट' संचालक)**

घोडेगाव येथे लाल कांदा ५५ रुपये प्रति किलो भाव, १३ नोव्हेंबर पर्यंत मार्केट राहणार बंद



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

घोडेगाव : नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव येथील उपआवारात नवीन लाल कांदा ५५ रुपये प्रति किलो भावाने विकला तर जुन्या कांद्याचे भाव स्थिर राहिले आसुन सरासरी लाल कांद्याच्या चांगल्या मालाला ४८ ते ५२ रुपये भाव मिळाला असल्याची माहिती कांदा आडतदार संतोष वाघ तसेच रतिलाल गांधी यांनी दिली.

उपवारात बुधवार (दि.४) रोजी जुन्या कांद्याच्या १८ एकशे ५४ गोण्यांची आवक झाली होती तर ७ हाजार दोनशे ३६ नवीन लाल गोण्यांची आवक झाली होती. या झालेल्या कांदा लिलावात जुन्या कांद्याला कांद्याला सरासरी चार हजार शंभर ते चार हजार तीनशे रुपये भाव मिळाला एक दोन लॉटला पाच हजार रुपये भाव मिळाला यात मोठा कांदा ४७०० ते ५०००, मुक्कल भारी ४००० ते ४५००, गोल्टा ३९०० ते ४२००, गोल्टी ३००० ते ३२०० तसेच , हल्का डंकी जोड कांदा १००० ते २२०० रुपये भाव मिळाला.

जाहीर नोटीस

निशाणी नंबर : ७
दिनांक : ०३/११/२०२६
नेमलेली तारीख : ११/१२/२०२६
ॲड.ए.डी. करडक
नेवासा कोर्ट, नेवासा

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब ज्यु.डी यांचे कोर्टात
वारस चौ.अ.नं. १५१/२०२६

अर्जदार-१) चंद्रकला सोपान साळवे, वय-४७, धंदा-घरकाम
२) अक्षय सोपान साळवे, वय-३१, धंदा-वकीली
३) अंजली विवेक पोटोळ, वय-२७, धंदा-घरकाम
४) अजय सोपान साळवे, वय-२५, धंदा-नोकरी, अर्जदार नं.१, २ व ४ रा.लोहगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर, अर्जदार नं. ४ रा. बायजाबाई जेऊर, ता.जि.अहिल्यानगर

सामनेवाले-कुणीही नाही
मयत
सोपान वसंत साळवे
दिनांक १५/०३/२०२५

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मा. न्यायालयामध्ये मयत सोपान वसंत साळवे हे दि.१५/०३/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना वरीलप्रमाणे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणुन अर्जदार नं.१ ते ४ यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरील वारस प्रमाणपत्र संबंधी कुणाचेही काहीएक म्हणणे किंवा कुणाची काही एक हरकत असेल तर या जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासुन ३० दिवसाच्या आत मा. न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकुम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०३/११/२०२६ रोजी माझी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा
नेमलेली तारीख : ११ /१२/२०२६

शिक्का
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय,
क. स्तर नेवासा

हुकूमावरुन
सहा. अधिक्ष
दिवाणी न्यायालय, क.स्तर
नेवासा

जाहीर नोटीस

निशाणी नंबर : ८
दिनांक : ०४/११/२०२६
नेमलेली तारीख : १८/१२/२०२६
ॲड.एस.एच. चव्हाण
नेवासा कोर्ट, नेवासा

नेवासा येथील मे.सिव्हिल जज्ज साहेब ज्यु.डी
यांचे कोर्टात
वारस चौ.अ.नं. १५०/२०२६

अर्जदार-१) रज्जाक निजामशा इनामदार, वय-५९, धंदा-शेती
२) मुख्तार निजाम इनामदार, वय-५७, धंदा-शेती
३) जब्बार निजाम इनामदार, वय-५०, धंदा-शेती
४) सायराबी जैनुद्दीन शेख, वय-६०, धंदा-घरकाम नं.१ ते ४ रा. कुकाणा, ता. नेवासा, जि.अ.नगर
५) तायराबी युनूस शेख, वय-५३, धंदा-घरकाम, रा.लोणी खुर्द, ता. राहाता, जि. अहिल्यानगर

सामनेवाले-कुणीही नाही
मयत
१) निजामशहा छत्रुशहा इनामदार (मयत दिनांक ०२/०२/२०१६)
२) इंताजबी निजाम इनामदार (मयत दिनांक २९/०१/२०२५)

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मा. न्यायालयामध्ये मयतास अर्जदार हे वारस आहेत, म्हणुन वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. निजामशहा छत्रुशहा इनामदार हे दिनांक ०२/०२/२०१६ रोजी अहमदनगर येथे मयत झालेले आहे. इंताजबी निजाम इनामदार हे दिनांक २९/०१/२०२५ रोजी मौजे कुकाणा, ता. नेवासा येथे मयत झालेले आहेत. त्यांना वरीलप्रमाणे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणुन अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरील वारस प्रमाणपत्र संबंधी कुणाचेही काहीएक म्हणणे किंवा कुणाची काही एक हरकत असेल तर या जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासुन ३० दिवसाच्या आत मा. न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकुम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०४/११/२०२६ रोजी माझी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा, नेमलेली तारीख : १८/१२/२०२६

शिक्का
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय,
क. स्तर नेवासा

हुकूमावरुन
सहा. अधिक्ष
दिवाणी न्यायालय, क.स्तर
नेवासा

जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ट स्तर, नांदेड यांच्या न्यायालयात समक्ष मंगेश रमणलाल कायस्थ ४ चे सह दि. न्या क. स्तर
नियमित दरखास्त ९/२०२२

वादी :-१.अब्दुल सलीम पि. अब्दुल सत्तार, वय ४१ वर्ष धंदा व्यापार, रा. लिबर्टी किडस गॅलरी, शॉप नं. ६. सी.टी.एस. न. १८८७, जवळ बालाजी मंदीर जी. जी. रोड नांदेड

विरुध्द :

प्रतिवादी : १/सी. सुनिता पि. मदनदास विष्णु वय ०० वर्ष धंदा घरकाम
२/डी. अनिता पि. मदनदास विष्णु वय ०० धंदा घरकाम
६.किरणदास पि. मदनदास विष्णु, वय ३५ धंदा व्यापार, सर्व जण रा. बालाजी मंदिरा गांधी रोड नांदेड व इतर

अर्ज

ज्या अर्थी नियमित दरखास्त क.९/२०२२ मध्ये वर नमुद हे ऋणको असून ऋणको क. १/सी व १/डी व ६ यांना न्यायालयाद्वारे वेळोवेळी समन्स काढले आहे. परंतू समन्स हे वर नमुद ऋणको क. १/सी व १/डी व ६ यांना तामील होत नसल्यामुळे धनको यांनी वरील नमुद ऋणको यांना क्र. १/सी व १/ ही विरुध्द वर्तमानपत्रात जाहीर समन्सचा अर्ज दिला असून तो मा. न्यायालयान मंजूर केला आहे.

त्या अर्थी प्रतिवादी क्र. १/सी व १/डी व ६ यांनी दिनांक ३०/११/२०२६ रोजी सकाळी ११. वाजता स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत लेखी स्वरूपात आपला लेखी जबाब नोंदवावा. अन्यथा कोणचाही आक्षेप नाही किंवा काही सांगवायाचे नाही. असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधितानी नोंद घ्यावी

आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी माझया सही निशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

क. लिपिक
४ थेसह दिवाणी न्यायालय, क स्तर, नांदेड

शिक्का

आदेशावरुन
स.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, नांदेड.

पान १ वरुन

शिक्षण विभागाच्या मनमानी कारभाराविरोधात शिक्षकांचा ऐतिहासिक महामोर्चा

आणि बदल्यांमध्ये गैरप्रकार होत असल्याचे आरोपही त्यांनी केले. आमदार सत्यजित तांबे यांनी शिक्षकांना शिकवण्याव्यतिरिक्त काम ांचा त्रास सहन करावा लागत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. शिक्षकांकडून कामासाठी पैसे मागितले जात असतील तर पैसे देणारेही दोषी आहेत, असे सांगत निवेदनातील सर्व मुद्दे संबंधित विभागात उपस्थित करून पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी शिक्षक नेते बापूसाहेब तांबे, प्रवीण ठुबे, विकास डावखरे, आबासाहेब जगताप, भाऊ चासकर, विवेकानंद पाटील आणि छात्र भारतीचे सावंत यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्रशासनाच्या वतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके आणि उपशिक्षणाधिकारी मीना शिवगुंडे यांनी समन्वय समितीचे निवेदन स्वीकारले. मोर्चादरम्यान धोत्रे येथील शिक्षकांनी पथनाट्यातून शिक्षकांच्या समस्या मांडल्या, तर चितळी स्टेशन शाळेतील शिक्षक मिलिंद खंडीझोड यांनी राक्षसी वेशभूषेतून शिक्षकांसमोरील अडचणींचे सादरीकरण केले.

शेतकऱ्यांना अपेक्षित मदत करावी : आदित्य ठाकरे

तर दुसऱ्या बाजूला सरकार कोट्यवधी रुपये खर्च करून मोठे कार्यक्रम आणि इव्हेंटबाजी करत आहे. पाच हजार रुपयांनी शेतकऱ्यांना खरोखर काहीही मदत होणार नाही. सरकारने मधला मार्ग काढून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष गरजेनुसार मदत करावी, असे ठाकरे म्हणाले.

शेतकऱ्यांचे पीकविमा अनुदान अद्याप मिळालेले नाही. गेल्या वर्षीचे पैसेही प्रलंबित आहेत. कर्जमाफी जाहीर झाली, मात्र तिचे पुढे काय झाले, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देताना सरकार हात आखडता घेते; मात्र सत्ता स्थापन करताना आमदारांच्या जुळवाजुळवीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात, अशी टीकाही त्यांनी केली. तुम्ही विमानातून फिरा, गाडीतून फिरा; पण शेतकऱ्यांचे हालही पाहा, असा टोलाही त्यांनी लगावला. सह्याद्रीतील वृक्षतोडीच्या प्रश्नावर बोलताना त्यांनी सरकारवर निशाणा साधला. सह्याद्री गुजरातमधील कंपन्यांसाठी विकायला काढल्याचा आरोप त्यांनी केला. शेतकऱ्यांच्या पाणीटंचाई, पीकनुकसान, चारा उपलब्धता, शासकीय मदत आणि इतर अडचणी जाणून घेऊन त्यांचा प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी राज्यभर शेतकरी मदत केंद्रे सुरू करण्यात येत असल्याचे जिल्हाप्रमुख रामदास गोल्हार यांनी सांगितले. यावेळी माजी खासदार चंद्रकांत खैरे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी आमदार सुनील शिंदे, जिल्हाप्रमुख रामदास गोल्हार, युवा नेते उदयन गडाख, बालेंद्र पोतदार, मच्छिंद्र म्हस्के पाटील यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रारंभी आदित्य ठाकरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

तावीजच्या बहाण्याने महिलेवर मौलानाचा अत्याचार

आईला आराम मिळेल व त्या बऱ्या होतील. असे म्हणुन त्या मौलानाने पिडीत महिलेला मोटारसायकलवर बसवून राहुरीकडे येत होता. दरम्यान राहुरी फॅक्टरी येथील धनलक्ष्मी लॉज समोर मौलाना ने मोटारसायकल उभी करुन त्या महिलेला म्हणाला की, सदर हॉटेलमध्ये माझ्या ओळखीचे मोठे मौलाना थांबलेले असुन आपल्या दोघांनाही आत रुममध्ये जावे लागेल असे म्हणाला. तेव्हा पिडीत महिला त्या मौलाना सोबत हॉटेलमधील रुम मध्ये गेली. तेव्हा महिलेने विचारले मोठे मौलाना कोठे आहेत. असे विचारुन महिला म्हणाली की मला रुम मधून बाहेर जायचे आहे, असे सांगीतले. तेव्हा आरोपी मौलाना शरिफ शेख याने पिडीत महिलेला शिवीगाळ करुन तीच्या अंगावरील कपडे काढले. आणि ओढणीने तीचे हातपाय बांधुन जिवे मारुन टाकण्याची धमकी देऊन दोन वेळा तीच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला. त्यानंतर जर या बाबत तु कोणाला काहीएक सांगीतले तर तुला मारुन टाकीन अशी धमकी देवुन तो बाथरुममध्ये निघुन गेला. तेव्हा पिडीत महिलेने मौलानाला बाथरुम मध्ये कोंडून तेथून पळ काढला. त्यानंतर दि. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास पिडीत महिला अहिल्यानगर येथील बारा बाभळी येथे मौलाना शरिफ शेख राहात असलेल्या मदरशा मध्ये गेली. तेथे मोठे मौलांना मुफ्ती याला महिलेने घडलेल्या घटने बाबत सांगीतले. त्याने मौलाना शरिफ शेख यास तेथे बोलावुन घेतले. त्यानंतर मुफ्ती मौलाना याने पिडीत महिलेला अश्लील भाषेत बोलून तीला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. तसेच सदर घटने बाबत तडजोड करण्यास सांगुन प्रकरण पैसे घेवुन मिटवुन टाक, असे म्हणाला. तेव्हा पिडीत महिलेने त्यास नकार दिला असता मुफ्ती मौलाना म्हणाला की, तु इकडे येवुन आमची बदनामी करते का? असे म्हणुन त्याने महिलेला जिवे मारण्याची धमकी दिली. घटने नंतर पिडीत महिलेने पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी मौलाना शरिफ सिलेमान शेख व मौलांना मुफ्ती, दोघे रा. बारा बाभळी म दरशा, अहिल्यानगर, या दोघांवर गुन्हा रजि. नं. १२१५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ६४(१), ६४(२)(एम), ११५(२), ३५१(२)(३), ३५२, ३(५) प्रमाणे मारहाण, धमकी, विनयभंग आणि बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच आरोपी मौलाना शरिफ सिलेमान शेख याला अटक करण्यात आली. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक गणेश वाघमारे हे करीत आहे.

नेवाशात आंतरजिल्हा सोयाबीन चोरांची टोळी पकडली

तिघे जेरबंद बुलढाणा-जालना जिल्ह्यांतील आरोपींचा सहभाग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : भुसार मालाचे दुकान फोडून सुमारे पावणेदोन लाख रुपये किमतीचे सोयाबीन चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात बुलढाणा आणि जालना जिल्ह्यांतील तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून १८.८० क्विंटल सोयाबीनसह एक लाख २८ हजार ७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अन्य दोघे फरार



आहेत.नेवासा तालुक्यातील हांडी निमगाव येथील शिनाई ई ट्रेडिंग या भुसार मालाच्या दुकानाचे ३१ ऑक्टोबर रोजी अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून एक लाख ७५ हजार रुपये किमतीचे सोयाबीन चोरून नेले होते. याप्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास केला. त्यातून भानुदास बाबुराव गायकवाड (वय ३३, रा. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा), विनोद विठ्ठल काळे (वय २८, रा. लोणगाव, जि. जालना) आणि अंकुश तेजराव खंदारे (वय ४०, रा. सातेफळ, जि. जालना) यांना ताब्यात घेतले.या गुन्ह्यात आकाश मोरे आणि बळीराम फुके हे दोघे फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ताब्यातील आरोपींना जप्त मुद्देमालासह नेवासा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे.

प्रेरणा अर्थ परिवाराच्या वतीने दिवाळीनिमित्त सभासदांना लाभांश वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



राहुरी : तालुक्यातील गुहा येथील प्रेरणा पतसंस्था व प्रेरणा मल्टीस्टेट व सोसायटी यांच्या वतीने दिवाळीनिमित्त सभासदांना लाभांशाचे वाटप करण्यात आले.यावेळी अध्यक्ष सुरेश वाबळे म्हणाले, प्रेरणा पतसंस्था प्रेरणा मल्टिस्टेट व प्रेरणा सोसायटी स्थापनेपासून सातत्याने सभासदांना दिवाळीसाठी लाभांश देत आहे. मा .खासदार प्रसादराव तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली संस्था प्रगतीपथावर आहे. आर्थिक शिस्त पाळली जात आहे. सभासदांना आधुनिक बँकिंग सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. सभासदांच्या हितसंबंधांनाच संस्थेत प्राधान्य दिले जाते आहे. आम्ही केवळ विश्वस्तांच्या भुमिकेत आहोत. अर्थ खात्यातील सहकार चळवळीमुळे सभासदांच्या आर्थिक विकासाला मोठा आधार मिळाला आहे. रोजगाराच्या, व्यापाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या. परिसराच्या आर्थिक विकासात सहकारी पतसंस्थांच्या चळवळीचा योगदान मोठे आहे. तारणासाठी केवळ सोनारावर अवलंबून न राहता त्यासाठी आता यंत्र आणलेली आहेत.

प्रेरणा पतसंस्थेत ठेवी १५४ कोटीअसून कर्ज वितरण ९९ कोटी आहे. प्रेरणा मल्टिस्टेटने १०२ कोटीठेवींचा टप्पा पार केला आहे. ७३ कोटी कर्ज वितरण झाले.या दोन्हीही संस्थांनी ११%लाभांश जाहीर केला.प्रेरणा सोसायटी ७% ने लाभांश जाहीर केला. कृषी शास्त्रज्ञ शेतकरी मंच कृषी विद्यापीठ व कृषी खाते महाराष्ट्र शासन प्रथम अध्यक्ष म्हणून सतिष राऊत यांची निवडझाले बद्दल त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

दुष्काळी परिस्थितीमुळे दिपावली असूनही बाजारपेठेत शुकशुकाट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

पुणतांबा : दुष्काळी परिस्थितीमुळे दिपावली सारखा महत्वाचा सण दोन दिवसावर आलेला असतांना पुणतांबा येथील जुनी मुख्य बाजारपेठ व स्टेशनरोड वरील बाजारपेठेत अजूनही शुकशुकाट असल्यामुळे छोट्या मोठ्या व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

पुणतांबा येथे रोजगारभिमुख एकादा उद्योग नसल्यामुळे १९८४ मध्ये चांगदेव शुगर मिल्स हा खाजगी क्षेत्रातील कारखाना बंद पडल्यानंतर पुणतांब्याच्या बाजारपेठेवर प्रतिकूल परिणाम झालेला आहे. सध्या बाजारपेठ शेतकरी वर्ग आशाकेंद्राचे कर्मचारी व थोडे फार असणारे नोकरी करणारे व सेवानिवृत्त कर्मचारी यांच्यावर अवलंबून आहे. असे असले तरी पुणतांबा येथील ग्रामस्थांना पुणतांब्या पासून अवघे १९ किमीटर अंतरावर असलेल्या श्रीरामपुरच्या बाजारपेठेचे आकर्षण आहे रस्ता खराब असूनही छोट्या मोठ्या खरेदीसाठी पुणतांबेकर श्रीरामपूरचा रस्ता धरतात. हे पुणतांब्याच्या बाजारपेठेच्या दृष्टीने संयुक्तिक वाटत नाही गावात किराणा मालासाठी किराणा दुकाने व मॉल आहेत. छोटी मोठी सुसज्ज कापड दुकाने आहेत. फटाके, दिपावलीसाठी आवश्यक लागणारे आकाश कंदिल पणत्या, सजावटीचे सामान उपलब्ध आहे. विशेष ह्या सर्व घटकाचे दर श्रीरामपूर पेक्षा निश्चीतच कमी आहे. तरी खरेदीदार श्रीरामपूरला जातात त्यामुळे सध्या येथील कोणत्याही दुकानात गर्दी नाही. शेतकरी वर्गाचे दुषकाळाचे अनुदान बँकेत जमा झाल्यामुळे थोडी फार बँकेत गर्दी दिसते. अन्यथा सर्वत्र शुकशुकाट च दिसून येत आहे.

संगमनेरमध्ये कत्तलीसाठी डांबलेल्या ५७ गोवंशीय जनावरांची सुटका

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवलेल्या ५७ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेने दोन ठिकाणी छापे टाकून सुटका केली. या कारवाईत १९ लाख ६० हजार रुपये किमतीची जनावरे जप्त करण्यात आली असून, याप्रकरणी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विशेष पथक तयार केले होते. या पथकाने २ नोव्हेंबर रोजी संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई केली.

पहिल्या कारवाईत १६ लाख रुपये किमतीची ४८ गोवंशीय जनावरे जप्त करण्यात आली. याप्रकरणी सोहेल समीर शेख (वय २७, रा. कुरण, ता. संगमनेर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत तीन लाख ६० हजार रुपये किमतीची नऊ जनावरे जप्त करण्यात आली. याप्रकरणी वसीम शेख आणि सद्दाम कुरेशी (दोघे रा. कुरण, संगमनेर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोघेही फरार आहेत. दोन्ही गुन्हे महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्यानुसार दाखल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.



उसाचा दर जाहीर न झाल्यास बेमुदत रस्ता आंदोलन करणार : रवींद्र मोरे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : शासनाने शेतकऱ्यांच्या ऊसाला दर जाहीर करावा व शेतकऱ्यांच्या इतर मागण्यासाठी येत्या ९ नोव्हेंबर पासून नगर मनमाड महामार्गावर बेमुदत रस्ता रोको आंदोलन करून चक्का जाम करण्याचा इशारा शिवसेना शेतकरी सेनेचे नेते रवींद्र मोरे यांनी दिला आहे

याबाबत तहसीलदार डॉ अमित पवार यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, गेल्या दीड महिन्यापासून तालुक्यातील सर्व साखर कारखान्याचे ऊस गळीत सुरू झाले असताना एकही साखर कारखानदाराने आतापर्यंत ऊसदर जाहीर केलेला नाही त्यामुळे शेतकरी संभ्रमात असताना आजपर्यंत लाखो टन उसाचे गाळप झाले आहे. मात्र कारखानदार ऊस दराची कोंडी फोडत नाही त्यामुळे दर कधी जाहीर करणार असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी शेतकरी सेनेने ८ ऑक्टोबर व २४ ऑक्टोबर रोजी आंदोलन केले होते त्यावेळी दराचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र आज ४ नोव्हेंबर उजाडली आहे तरीही याबाबत तोडगा नसल्याने येत्या ९ तारखेपासून



नगर मनमाड अडविण्याचा निर्णय तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील तसेच तालुक्यातील हजारो शेतकरी सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले असून ऊस दराचा ठोस निर्णय झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

निवेदनावर रवींद्र बापूसाहेब मोरे राजेंद्र लोंढे,प्रकाश देठे, मधुकर तारडे ,अशोक निमसे ,सुभाष जुंद्रे विजय तोडमल ,सोपान काळे,सचिन पवळे सचिन म्हसे,सोन्याबापु बांगरे अनिकेत कुलकर्णी ,महेश कुलकर्णी सतीश पवार ,गोरक्षनाथ गुंड, रावसाहेब तनपुरे ,शिवराम कडू,जालिंदर मुसमाडे , जयवंतराव पवार नवनाथ पवार ,आनंद वने ,प्रभाकर जाधव,रवींद्र गुंड ,दिनेश वराळे,अनिल सांगळे ,रामेश्वर तुवर,बाळासाहेब भुजाडी सिद्धार्थ सोनवणे, रियाज पटेल आदीच्या सह्या आहेत.

बेलापूरच्या दोन वकिलांना राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेचा पुरस्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : तालुक्यातील बेलापूरचे सुपुत्र ॲड. अजिंक्य पुरुषोत्तम साळुंके व ॲड. मयूर पुरुषोत्तम साळुंके यांना विधी व न्याय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रीय स्तरावरील 'द मोस्ट ट्रस्टेड लीगल लीडर अँड लॉ असोसिएट्स एक्सलन्स अवॉर्ड २०२६' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुण्यातील वाकड येथील हॉटेल सयाजी येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेत्री तथा माजी खासदार जया प्रदा यांच्या हस्ते त्यांना स्मृतिचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात आले.इंडिया एक्सलन्स अवॉर्ड्स आणि इनसाईट्स टू सक्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नॅशनल प्रेस्टिज अवॉर्ड्स अँड समिट २०२६' या राष्ट्रीय सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ॲड. अजिंक्य साळुंके व ॲड. मयूर साळुंके यांनी वकिली व्यवसायात कार्यरत असताना ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिक आणि गरजू पक्षकारांना कायदेशीर मार्गदर्शन व न्यायालयीन मदत उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. पक्षकारांशी पारदर्शकता, विश्वासार्हता आणि व्यावसायिक निष्ठा जपत त्यांनी विधी क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

बेलापूरच्या दोन भूमिपुत्रांनी राष्ट्रीय स्तरावर मिळविलेल्या या यशामुळे श्रीरामपूर तालुक्यासह बेलापूर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या सन्मानाबद्दल श्रीरामपूर तालुका वकील संघ, न्यायालयीन सहकारी, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

अनिकेत काळे फ्रेंड्स सर्कल चॅम्पियन क्रिकेट स्पर्धा २०२६'चा थरार संपला, ए. के. विघ्नहर्ता संघ विजेता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर गंगापूर-वैजापूर परिसरातील क्रिकेटप्रेमींसाठी आकर्षण ठरलेल्या ओम साई क्रिकेट क्लबतर्फे आयोजित 'अनिकेत काळे फ्रेंड्स सर्कल चॅम्पियन क्रिकेट स्पर्धा २०२६'चा अंतिम सामना काल उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अटीतटीच्या सामन्यात ए. के. विघ्नहर्ता संघाने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले, तर ओम साई सी.सी. संघाने द्वितीय क्रमांक मिळवत उपविजेतेपदावर समाधान मानले.

स्पर्धेतील प्रथम विजेत्या ए. के. विघ्नहर्ता संघाला २१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक आमदार प्रशांत बंब यांचे स्वीय सहाय्यक कृष्णकांत व्यवहारे व रुग्ण कल्याण समितीचे सदस्य तथा भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष अतुल रासकर यांच्या वतीने देण्यात



आले. द्वितीय विजेत्या ओम साई सी.सी. संघाला १५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक नगरसेवक आनंद पाटील यांच्या वतीने देण्यात आले. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या संघांच्या ट्रॉफीचे सौजन्य नानासाहेब जगताप यांनी केले.

याशिवाय वैयक्तिक कामगिरी करणाऱ्या खेळाडूंनाही रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. मॅन ऑफ द सिरीजचा पुरस्कार शारूख शहा यांना मिळाला असून २,१०० रुपयांचे पारितोषिक डॉ. निलेश सुंब यांच्या वतीने देण्यात आले. बेस्ट बॅट्समनचा पुरस्कार तेजस धनायत यांना मिळाला असून १,५०० रुपयांचे पारितोषिक आकाश साळुंके यांच्या वतीने देण्यात आले. बेस्ट बॉलरचा पुरस्कार प्रवीण चव्हाण यांनी पटकावला असून १,५०० रुपयांचे पारितोषिक अमोल साबणे यांच्या वतीने देण्यात आले.

यां प्रसंगी माजी नगरसेवक प्रदीप पाटील, नगरसेवक आबासाहेब शिरसाठ, शेखर पाटील, राजेंद्र राठोड, नगरसेवक दिपक साळवे, पत्रकार अमीन पटेल,बंधन बँकेचे राजेंद्र प्रधान, सूरज राजपूत, संदीप पवार, रामेश्वर पाटील,सतीश बारे,निवृत्ती अभंग, ज्ञानेश्वर सवई, सरपंच नंदुभाऊ सजगुरे, संजय अभंग,अमोल नारळे, योगेश पुंड, बापू गायगवाड, अक्षय पाटील, दीपक भालेकर, महेंद्र चव्हाण, मुन्ना शेख, अशफाक शेख, अजय गायवाड, संदीप भालेकर, ऋषी जाधव, बाळा सावंत, कृष्णा गायवाड, अजय भालेकर, रवी सुरासे, यशोधर येवले व आदित्य ठोंबरे यांच्यासह परिसरातील क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

निधनवार्ता

विठ्ठल अभंग



हातगाव - येथील रहिवाशी व माजी सरपंच विठ्ठल भाऊराव अभंग यांचे नुकतेच वयाच्या ६५ व्या ऱ्हायविकारच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. त्यांनी हातगाव गावचे ५ वर्षे सरपंचपद भूषविले असून श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे काही काळ ते संचालक होते.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, २ मुले १ मुलगी व नातवंडे असा मोठा परिवार आहे. चाकण येथील डॉ. नंदकिशोर अभंग यांचे ते सख्खे बंधू व हातगाव येथील डॉ. अनिल अभंग यांचे ते चुलत बंधू होते.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

गुरुवार दि. ५ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे उदय-अस्त	सिंगल ५-१-९ मजबुत		
१२० ४३० ६७०	३-४	१५८ २४८ २२०	३६-८४-७१-२०-४९
कल्याण उदय-अस्त	**सिंगल ९-४-५ मजबुत**		
१९० २८० २२६	०-२	१५६ १२९ ११०	०६-३२-४८-७५-२९
मुंबैम (मेन) उदय-अस्त	**सिंगल ४-७-९ मजबुत**		
१२५ २६० २३४	८-१	१२८ १४६ १००	८६-२१-५४-९७-१०

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
27/07/2026 to 31/07/2026	25 59 60 55 50	59 00 42 22 28	35 58 62 39 00	40 00 47 89 00	16 00 70 48 88
03/08/2026 to 07/08/2026	23 34 90 56 69	17 00 85 15 59	33 38 42 12 29	46 00 09 47 78	37 00 05 34 48
10/08/2026 to 14/08/2026	57 77 99 23 34	23 30 53 14 48	25 50 70 23 35	35 55 39 13 53	13 33 76 35 58
17/08/2026 to 21/08/2026	24 40 60 46 00	27 78 73 34 46	11 16 82 48 80	15 56 23 77 79	44 49 77 17 79
24/08/2026 to 28/08/2026	36 00 96 79 00	25 55 23 22 99	78 99 42 23 77	45 00 98 44 00	26 66 41 29 00
31/08/2026 to 04/09/2026	14 49 43 67 00	17 00 81 56 00	15 59 52 33 66	69 00 50 23 55	57 57 99 13 55
07/09/2026 to 11/09/2026	68 00 47 55 57	22 28 27 12 44	57 00 26 35 88	11 12 43 77 79	44 45 33 68 89
14/09/2026 to 18/09/2026	78 89 47 12 44	33 36 20 13 66	79 99 56 17 88	68 00 42 34 55	39 99 16 79 00
21/09/2026 to 25/09/2026	39 00 25 34 88	45 57 62 12 99	48 00 23 59 99	16 66 30 47 99	15 00 60 28 00
28/09/2026 to 02/10/2026	66 99 19 13 55	13 37 18 27 99	26 00 84 25 77	66 00 29 12 66	36 99 84 77 00
05/10/2026 to 09/10/2026	14 40 57 25 00	45 59 85 16 88	13 30 48 56 77	46 99 99 12 66	55 88 84 59 00
12/10/2026 to 16/10/2026	16 00 79 56 88	29 00 11 66 99	12 22 58 18 89	13 00 46 12 33	25 57 42 48 00

माधुरी बाजार डे / नाईट

१६७ ४७८ २८७३ ५९० | ४- ४९ | १२६ ९६५६ २५७ २७० | ६३-७०-२०-३८-७७

१ - ६ - ०

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
५५९	३८०
९०	१५
३३४	१४०

dpbosssss.live | Mydpboss.com

किल्ला निर्मिती स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी अनुभवला इतिहास

प्राईड अकॅडमीत 'विजयदुर्ग'चा विजय!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान : महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास गडकिल्ल्यांमध्ये सामावला असून गड-किल्ले संवर्धन ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना आपल्या जाज्वल्य इतिहासाची माहिती व्हावी व गड-किल्ल्यांविषयी त्यांच्या मनात जाणीव व आदर निर्माण व्हावा, या शैक्षणिक उद्देशाने माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक ज्ञानेश्वर मुरकुटे यांच्या नेतृत्वाखाली माऊली प्रतिष्ठान संचलित प्राईड अकॅडेमी इंग्लिश मीडियम, वांगी भेडापूर येथे भव्य 'गड किल्ले बनवा' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या संचालिका डॉ. वंदना मुरकुटे व व्यवस्थापनाच्या विशेष संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या अत्यंत स्पर्धात्मक वातावरणात विद्यार्थ्यांनी खूप उत्सुकतापूर्वक आणि उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. शाळेतील चार वेगवेगळ्या हाऊसच्या विद्यार्थ्यांनी राजगड, विजयदुर्ग, पद्मदुर्ग आणि रायगड या ऐतिहासिक किल्ल्यांच्या भव्य प्रतिकृती साकारल्या. तर दुसरीकडे, प्री-प्रायमरीच्या चिमुकल्या बालगोपाळांनी 'सिंधुदुर्ग' हा जलदुर्ग अतिशय सुंदर आणि आकर्षक पद्धतीने बनवून उपस्थितांची मने जिंकली.

या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक वास्तुकलेचा अभ्यास तर केलाच, सोबतीने सांघिक भावना (ढशरा थेॲज्ञ), कल्पकता,



नियोजन आणि वेळेचे व्यवस्थापन यांसारखी महत्त्वाची कौशल्ये आत्मसात केली. केवळ पुस्तकी ज्ञान न घेता, प्रत्यक्ष प्रतिकृती तयार केल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि त्यांचे गड-किल्ले संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर अगदी सहजपणे बिंबवले गेले.

हा अनोखा शैक्षणिक सोहळा व स्पर्धा पाहण्यासाठी पालक वर्ग व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व मान्यवर व पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींची अतिशय सूक्ष्म पद्धतीने पाहणी केली. त्यानंतर त्यांनी दिलेल्या मतदानाच्या आधारे 'सामवेद हाऊस'ने साकारलेल्या 'विजयदुर्ग' किल्ल्याला अधिकृतपणे विजयी घोषित करण्यात आले. निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या प्राचार्य अस्मिता देवरे, प्री-प्रायमरीच्या प्राचार्य प्रीती गोटे तसेच सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या या कौशल्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

महापालिकेच्या सभेत पाणीप्रश्न, विकास आराखडा व रस्त्यांच्या मुद्द्यांवर चर्चा

गंगा उद्यान चौकात स्व. अरुणकाका जगताप यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा ठराव मंजूर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : अहिल्यानगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी पार पडली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शहरातील पाणीप्रश्न, धरणातील पाणीसाठा, विविध प्रभागांतील अनियमित व दूषित पाणीपुरवठा, महावितरणला जागा उपलब्ध करून देण्याचा विषय, शहर विकास आराखड्याला उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती, रस्त्यांची कामे आणि पथदिव्यांच्या प्रश्नांवर सभेत जोरदार चर्चा झाली. विविध नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरत नागरिकांच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. पथदिव्यांच्या मुद्द्यावर नगरसेवकांमध्ये खडाजंगीही झाली. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, उपायुक्त मेहर लहारे उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला संपत बारस्कर यांनी आधी विषयपत्रिकेवरील विषय घेण्याची मागणी केली. त्यानंतर दुखवट्याचे प्रस्ताव मांडण्यात आले. यामध्ये नाना पाटेकर, भानुदास कोतकर, यश जाधव, आमदार कुमार सप्तर्षी, माजी नगरसेवक बाळासाहेब गायकवाड, गुलशनशेठ जग्गी, अंबादास पंधाडे आणि अजय साळवे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

गंगा उद्यान चौक येथे स्वर्गीय आमदार अरुणकाका जगताप यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा विषय सभेत चर्चेला आला. सागर बोरुडे यांनी पुतळा उभारणीसाठी आवश्यक प्रक्रिया आणि परवानग्या मिळविण्याकरिता कालमर्यादा निश्चित करावी, तसेच या कामाचा पाठपुरावा करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करावी, अशी मागणी केली. सुरेश बनसोडे यांनी चौकाला 'काका चौक' असे नाव देऊन नामकरण करण्याची सूचना केली. बाबासाहेब वाकळे यांनीही समिती स्थापन करून पुतळा उभारणीची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, चौकाचे सुशोभीकरण करावे



आणि चौकाला अरुणकाकांचे नाव द्यावे, अशी भूमिका मांडली. यावेळी संपत बारस्कर आणि प्रकाश भागानगरे यांनीही चर्चेत सहभाग घेतला.

महापौर ज्योती गाडे यांनी महापौर, उपमहापौर, बाबासाहेब वाकळे आणि संपत बारस्कर यांच्यासह सर्व संबंधितांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात येईल, असे सांगितले. त्यानंतर हा विषय मंजूर करण्यात आला.

शहरातील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर सभेत सविस्तर चर्चा झाली. निखिल वारे यांनी १४ ग्रामपंचायतींकडे महापालिकेची १६१ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचा मुद्दा उपस्थित केला. सामान्य नागरिकांचे नळजोड तोडण्याची कारवाई महापालिका करते, मग ग्रामपंचायतींकडील थकबाकी वसूल करण्यासाठी काय कारवाई केली, न्यायालयात दावा दाखल केला आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. प्रशासनाने या प्रकरणी खंबीर भूमिका घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. यावर गणेश गाडळकर यांनी जिल्हा परिषदेकडे थकबाकी वसुलीसाठी पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले.

निखिल वारे यांनी विळद येथील पाण्याच्या टाकीजवळील एक्स्प्रेस फिडरचा खर्च महापालिका करत असताना तेथून खासगी व्यक्तीला वीजजोडणी देण्यात आली आहे का, अशी विचारणा केली. यासाठी महापालिकेने ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. संपत बारस्कर यांनी पाणी कपातीबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी केली.

सुनीता कांबळे आणि विजय पठारे यांनी केडगावात सहा ते सात दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. पाणीपुरवठा सुरळीत होत नसेल तर आम्हाला महापालिकेतून काढून टाका, अशी संतप्त भूमिका त्यांनी मांडली. यावर गणेश गाडळकर यांनी गेल्या तीन महिन्यांपासून सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याने पाणीपुरवठ्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. आता टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठा सुरळीत होत असल्याचे सांगितले. शहाबाज सय्यद यांनी मुकुंदनगर येथील पाण्याच्या टाकीच्या व्हॉल्व्हचे साहित्य उपलब्ध होत नसल्याने दुरुस्ती रखडली असून, तेथे गळती सुरू असल्याचा मुद्दा मांडला. यावर गणेश गाडळकर यांनी लवकरच काम पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन दिले. रोशनी त्र्यंबके यांनी प्रभाग क्रमांक दोनमध्ये अवेळी पाणीपुरवठा होत असल्याचे सांगितले. रात्री एक वाजता पाणी सोडले जात असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

द•ख•ल

सुमया शेख यांना 'बेस्ट प्लेअर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित!

अहिल्यानगर : श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलच्या माजी विद्यार्थिनी सुमया शेख यांना महाराष्ट्र राज्य वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनतर्फे उत्कृष्ट खेळाडू म्हणून सन २०२६-२७ च्या 'बेस्ट



प्लेअर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांची शिवछत्रपती प्रबोधिनी, बालेवाडी येथे प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. पुरस्कार आणि प्रशिक्षणासाठी झालेल्या या निवडीमुळे सुमया यांनी फुटबॉल क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सुमया शेख यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, खेळाप्रती असलेली निष्ठा आणि सातत्यपूर्ण सराव महत्त्वाचा ठरला आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव झाला असून, नवोदित खेळाडूंनाही प्रेरणा मिळाली आहे. या यशासाठी श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल संस्थेचे अध्यक्ष अशोक कानडे, उपाध्यक्ष नंदकिशोर भावसार, मुख्याध्यापिका अरुंधती भोकरे, माधवी जकल तसेच प्रशिक्षक प्रसाद पांडुळे, संजय गायकवाड आणि मंदा ताथेड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सुमया शेख यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल आणि शिवछत्रपती प्रबोधिनी, बालेवाडी येथे प्रशिक्षणासाठी झालेल्या निवडीबद्दल संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, प्रशिक्षक, विद्यार्थी आणि पालकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

शिक्षणाधिकारी गायकवाड यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांशी साधला संवाद



अहिल्यानगर : अहमदनगर यतीमखाना ट्रस्ट संचलित अहमदनगर हायस्कूल (मराठी माध्यम) आणि जकरीया आघाडी प्राथमिक शाळेच्या वतीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती संध्या गायकवाड यांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी मा. जिल्हा समाजकल्याण अधिकारी रफिक मुंशी यांच्या हस्ते श्रीमती गायकवाड यांना सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास प्राचार्या मेघना राजेंद्र कुलकर्णी आणि मुख्याध्यापिका शमीम पठाण उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका इशा तांबोळी यांनी केले. याप्रसंगी शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी अहमदनगर यतीमखाना ट्रस्ट संचलित शाळांना सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांमधील आपुलकी, शिस्त, आत्मविश्वास आणि एकमेकांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते पाहून त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले. वसतिगृहातील वातावरणात विद्यार्थी अत्यंत आनंदाने, मोकळेपणाने आणि एकोप्याने राहत असल्याचे पाहून त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कुराण पठणाचेही त्यांनी विशेष कौतुक केले. आपल्या मनोगतात त्या म्हणाल्या, प्रत्येक मूल हे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण असते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण असतात. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील हे गुण ओळखून त्यांना योग्य दिशा द्यावी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवावा.

एमआयडीसीत कारची काच फोडून १ लाखांची रोकड लांबवली; गुन्हा दाखल

अहिल्यानगर : एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिवसाढवळ्या गाडीची काच फोडून एका लुटारूने एक लाखांची रोकड चोरून नेल्याची घटना घडली आहे. फिर्यादी योगेश संपतराव कातोरे यांची मालकीची हेरियर गाडी क्रमांक १६ सीव्ही ७३८३ ही एस. के. एंटरप्रायजेस ब्लॉक क्रमांक एफ-२६ एमआयडीसी अहिल्यानगर येथे पार्किंग केली होती. दिनांक ३ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी दोन ते अडीच वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. पार्किंग केलेल्या सदर गाडीच्या डाव्या पुढील दरवाजाची काच अज्ञाताने फोडली. गाडीच्या आत सुरक्षित ठेवलेले एक लाख रुपयांची रोकड, ज्यामध्ये पाचशे रुपयांच्या चलनी नोटांचा समावेश होता, ती रक्कम कोणीतरी अज्ञात व्यक्तीने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी व लबाडीच्या इराद्याने चोरून नेली. या प्रकरणी योगेश कातोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस हेड कॉन्स्टेबल फोलाणे व साहाय्यक पोलीस निरीक्षक करीत आहेत.



माळीवाड्यात घरासमोर गाडी लावण्याच्या कारणावरून मारहाण : गुन्हा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : अहिल्यानगर शहरातील माळीवाडा परिसरातील इवळे गल्लीत घरासमोर गाडी लावण्याच्या क्षुल्लक कारणावरून दोन जणांनी एकाच्या घरात घुसून लोखंडी दांडक्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसंत केशव पालवे (वय ७३, रा. इवळे गल्ली, माळीवाडा, अहिल्यानगर) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार आरोपी पूजा हस्तीमल मुथा व संकेत उर्फ हर्ष हस्तीमल मुथा (दोघे रा. इवळे गल्ली, माळीवाडा, अहिल्यानगर) यांनी ही मारहाण केली आहे.

काल रात्री आठ वाजण्याच्या सुमारास इवळे गल्लीतील फिर्यादीच्या घरासमोर गाडी लावण्यावरून वाद झाला होता. वादाच्या कारणातून आरोपींनी संगनमत करून थेट फिर्यादीच्या घरात प्रवेश केला. घरातील व्यक्तीला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले. याशिवाय आरोपींनी शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकीही दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस अंमलदार दिपाली भालेराव करत आहेत. घटनेमुळे परिसरात काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनी वादावादी टाळून सामंजस्य ठेवावे असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

गणपतराव देठे यांना आयडॉल पुरस्कार

निघोज : महाराष्ट्र राज्य शिक्षण संशोधन परिषद पुणे यांच्या वतीने देण्यात येणारा आयडॉल पुरस्कार निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गणपतराव काशिनाथ देठे यांना जाहीर झाला आहे. पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक, उपमुख्याध्यापक ते मुख्याध्यापक पदावर काम करताना देठे सर यांनी इयत्ता पहिली ते चौथी विद्यार्थी जास्तीत जास्त संख्येने विविध परिक्षेत चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण होऊन तालुका, जिल्हा, विभागीय तसेच राज्य स्तरावरील शैक्षणिक स्पर्धेत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण परिश्रम घेतले आहेत. निघोज पंचक्रोशीतील शाळांवर काम करताना त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य उज्ज्वल केले आहे. गेली तीस वर्षांच्या शैक्षणिक सेवेत कार्यरत राहून त्यांचे विद्यार्थी आज राज्य व केंद्र शासनाच्या सेवेत वरिष्ठ अधिकारी म्हणून काम करीत आहेत.

मळगंगा देवीच्या आशीर्वादने व जनतेच्या पाठबळने जिल्हा बँकेत संचालक होण्याची संधी : खा. लंके

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



निघोज : राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा आशीर्वाद आपल्याला गेली दहा ते पंधरा वर्षे सातत्याने मिळत आहे. तसेच जनतेचे पाठबळ असल्यानेच आपल्याला जिल्हा सहकारी बँकेत संचालक होण्याची संधी मोठ्या मताधिक्याने मिळाली असून आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत विरोधक भुईसपाट होतील अशी खात्री खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केली आहे. जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजय मिळाल्यानंतर त्यांनी प्रथम सुपा येथे सत्कार स्वीकारला तसेच त्यांनी पारनेर येथे सत्कार घेतल्यानंतर ते लगेच निघोज येथील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या दर्शनासाठी आले होते. देवीचे दर्शन घेऊन त्यांनी आशिर्वाद घेतल्यानंतर त्यांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट कार्यालयात ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद सर तसेच उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ भास्करराव शिरोळे, माजी सरपंच ठकारामशेठ लंके, सर्व विश्वस्त मंडळ, सचिव शांताराम कळसकर, सहसचिव विश्वास शेटे, बाबासाहेब कवाद निघोज ग्रामीण सहकारी संस्थेचे सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ, निघोज सोसायटीचे सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ, निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ, श्री. बाबासाहेब कवाद ग्रामविकास सेवाभावी संस्थेचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त मंडळ, ग्रामपंचायत सदस्य तसेच लोकनेते निलेश लंके प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. खासदार लंके यावेळी म्हणाले आपल्याला थांबवीण्यासाठी सर्व विरोधक एकत्र आले मात्र पंचायत समिती सदस्य ते आमदार व खासदार म्हणून आपण जनतेची सेवा केली. मळगंगा मातेच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या निघोज नगरी असो किंवा संपूर्ण मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली म्हणून आपण जनतेच्या पाठबळाने जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत विक्रमी मताधिक्य मिळवून संचालक झालो.

दिवाळीत सेवाप्रीतच्या महिलांनी उजळविले बालभवन

इन्व्हर्टरच्या भेटीतून विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अंधार केला दूर!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि नव्या आशेचा सण! या सणाचा खरा अर्थ केवळ दिव्यांची रोषणाई करण्यात नसून, गरजूंच्या आयुष्यात आनंदाचा आणि आशेचा प्रकाश निर्माण करण्यात आहे, याची प्रचिती सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या महिलांनी घडवून आणली. कोठला येथील स्नेहालय संचलित उत्कर्ष बालभवनमध्ये दिवाळी साजरी करताना फाऊंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजेची जाणीव ठेवून इन्व्हर्टर भेट देण्यात आला. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतरही विद्यार्थ्यांचा अभ्यास थांबू नये, त्यांना अंधारामुळे शिक्षण सोडून घरी परतावे लागू नये, या संवेदनशील भावनेतून देण्यात आलेल्या या भेटीमुळे बालभवनमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग अधिक प्रकाशमान करण्याचा



प्रयत्न करण्यात आला.

दिवाळीच्या निमित्ताने सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या सदस्यांनी बालभवनमधील विद्यार्थ्यांसोबत आनंदाचे क्षण साजरे केले. यावेळी सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सेवाप्रीतच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, प्रकल्प प्रमुख डॉ. सिमरन वधवा, खजिनदार अर्चना खंडेलवाल यांच्यासह दीपिका चोहितरमानी, शेरी धुप्पड, कल्पना जामगावकर, डॉ. प्रिया मुनोत, वीणा जगताप, अनु थापर, गगन बग्गा, लीना दंडवाणी, जया मेघानी, निशी गुजराती, स्वीटी गुप्ता आणि टीना कुमार उपस्थित होत्या.

बालभवनच्या रुबीना शेख यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. बालभवनमधील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी आणि त्यांच्या गरजांची माहिती त्यांनी दिली. पूजा काळे यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला. यास्मिन शेख यांनी स्वागत केले.

यावेळी जागृती ओबेरॉय यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जीवनात मोठे ध्येय ठेवण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या, जीवनात स्वतःला कधीही कमी समजू नका. आपण कोणत्या परिस्थितीत जन्माला आलो, यापेक्षा त्या परिस्थितीतून स्वतःला कसे घडवतो, याला अधिक महत्त्व आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी तिच्याशी धैर्याने सामना करून आपले ध्येय गाठण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर प्रत्येकाला यश मिळवता येते, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

डॉ. सिमरन वधवा यांनी गोष्टींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना जीवनमूल्यांची शिकवण दिली. जीवनात चांगले घडण्यासाठी संयम ठेवणे आवश्यक आहे. अपेक्षित यश मिळण्यास उशीर झाला, तरी निराश होऊ नका. कधी कधी चांगल्या गोष्टी घडण्यासाठी वेळ द्यावा लागतो. त्यामुळे सातत्याने प्रयत्न करत राहा, असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

केडगावात गाड्या बाजूला घेण्यावरून राडा; चौघांविरोधात गुन्हा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : शहरातील केडगाव परिसरातील दीपनगर भागात गाड्या रस्त्यातून काढून घेण्यावरून झालेल्या वादातून एका तरुणावर व त्याच्या आईवर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी यश जितेंद्र वेदपाठक (वय १८, रा. दीपनगर, केडगाव) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली असून, त्यांच्या तक्रारीनुसार आरोपी अविनाश रमेश वानखेडे, अमोल रमेश वानखेडे, पूजा अविनाश वानखेडे आणि मंदा रमेश वानखेडे (सर्व रा. दीपनगर, केडगाव, अहिल्यानगर) यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादीस तुमच्या गाड्या रस्त्यातून काढून घ्या, नाहीतर पेट्रोल टाकून पेटवून देऊ, असे म्हटले. त्यावर फिर्यादीने असे का बोलत आहात, असे विचारल्याचा राग आल्याने आरोपींनी रिक्षातून प्लास्टिकचा खोऱ्याचा दांडा आणून फिर्यादीस पाठीवर व डोक्यात मारहाण केली. दरम्यान, भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या फिर्यादीच्या आईलाही आरोपींनी लाथाबुक्क्यांनी व हाताबाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर जखमींना उपचारासाठी शहरातील अपेक्स हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले असून, या प्रकरणी महिला पोलीस नाईक योगीता साळवे पुढील तपास करत आहेत.

फटाक्यांच्या आतिषबाजीपेक्षा पर्यावरण संवर्धनाचा प्रकाश महत्त्वाचा!

विद्यार्थ्यांची फटाकेमुक्त दिवाळीची सामूहिक प्रतिज्ञा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी : दिवाळीचा खरा आनंद फटाक्यांच्या कर्णकर्कश आवाजात नसून निसर्गाच्या सान्निध्यात, आपुलकीच्या नात्यांत आणि आनंदाच्या प्रकाशात दडलेला आहे, हा मोलाचा संदेश पाथर्डी येथील संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने समाजाला दिला आहे. सण साजरा करताना पर्यावरणाचे रक्षण, सामाजिक भान आणि इतरांच्या आनंदाचा विचार करण्याची संस्कृती विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने विद्यालयात फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली. केवळ शैक्षणिक ज्ञान न देता विद्यार्थ्यांना संवेदनशील, जबाबदार आणि पर्यावरणप्रेमी नागरिक घडविण्याच्या दिशेने टाकलेले हे पाऊल निश्चितच कौतुकास्पद ठरले.

या उपक्रमात अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे शशिकांत गायकवाड सर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व प्रभावीपणे विशद केले. जागतिक पर्यावरणासमोरील आव्हाने, वाढते वायू व ध्वनिप्रदूषण, मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गाची होत असलेली हानी आणि फटाक्यांच्या वापरामुळे निर्माण होणारे दुष्परिणाम यांची



त्यांनी सविस्तर माहिती दिली. फटाके वाजविण्याचा आनंद काही क्षणांचा असला, तरी त्यातून निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचा परिणाम मात्र अनेकांना सहन करावा लागतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी व्यक्ती आणि मुक्या प्राण्यांना फटाक्यांच्या मोठ्या आवाजाचा त्रास होतो. त्यामुळे स्वतःचा आनंद साजरा करताना इतरांच्या वेदनांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही, ही जाणीव त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिली.

दिवाळी हा प्रकाशाचा, मांगल्याचा आणि आनंदाचा सण आहे. हा आनंद फटाक्यांशिवायही तितक्याच उत्साहाने साजरा करता येतो. नवीन कपडे, गोडधोड पदार्थ, घराची आकर्षक विद्युत रोषणाई, कुटुंबीयांसोबतचे आनंदाचे क्षण आणि गरजूंच्या चेहऱ्यावर फुलवलेले हास्य यातच दिवाळीचे खरे सौंदर्य आहे. पर्यावरणाचा समतोल राखणे ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचा निर्धार करावा आणि आपल्या कुटुंबीयांसह मित्रपरिवारालाही यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन गायकवाड यांनी केले.

या मार्गदर्शनातून प्रेरणा घेत विद्यार्थ्यांनी फटाके न वाजविण्याची आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. विद्यार्थ्यांच्या या संकल्पातून निसर्गाप्रती असलेली जाणीव आणि सामाजिक जबाबदारीचे भान अधोरेखित झाले. आजच्या विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणाविषयी प्रेम, संवेदनशीलता आणि जबाबदारीची भावना निर्माण झाली, तर उद्याचा समाज अधिक जागरूक आणि निसर्गपूरक बनेल, असा विश्वास या उपक्रमातून व्यक्त झाला.

दखल

खंडू भोजने यांची आंबेगाव तालुका देखरेख संघाच्या संचालकपदी निवड



लोणी धामणी : जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन खंडू गेणभाऊ भोजने यांची आंबेगाव तालुका देखरेख संघाच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाली आहे.खंडू भोजने हे गेल्या अनेक वर्षांपासून जारकरवाडी विकास सोसायटीचे चेअरमन म्हणून सहकार क्षेत्रात कार्यरत आहेत. तसेच आंबेगाव तालुका शेतमाल प्रक्रिया संस्थेचे संचालक म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत. सहकार क्षेत्रातील त्यांचा अनुभव, कार्यतत्परता आणि गावाच्या विकासकामांमध्ये असलेला सक्रिय सहभाग यामुळे त्यांची या पदावर निवड झाल्याचे मानले जात आहे.

त्यांच्या या बिनविरोध निवडीमुळे जारकरवाडी गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून ग्रामस्थांनी, सहकार क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी व हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

शंभर शेतकऱ्यांना मका बियाण्यांचे अनुदानावर वाटप



लोणी धामणी : पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या प्रयत्नातून जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती आंबेगाव यांच्या वतीने पशुसंवर्धन विभागाच्या सर्वसाधारण योजनेअंतर्गत चारा उत्पादन वैरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमांतर्गत वडगावपीर येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील लोणी, खडकवाडी, वडगावपीर आणि मांदळेवाडी येथील एकूण १०० शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच किलो याप्रमाणे एकूण ५०० किलो मका बियाण्यांचे शंभर टक्के अनुदानावर वाटप करण्यात आले.पंचायत समिती सदस्या कु. अंकिता अनिल वाळुंज यांच्या शुभहस्ते शेतकऱ्यांना मका बियाण्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना जनावरांसाठी हिरवा चारा उपलब्ध करून देण्यास मदत होणार असून पशुधन संवर्धनालाही चालना मिळणार आहे.यावेळी पशुवैद्यकीय डॉ. प्रेरणा मुळूक, पानसरे, पशुसखी सोनाली खंडागळे, ज्योती वाळुंज, अर्चना रणपिसे, प्रियंका आदक व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुष्काळी परिस्थिती आणि चाऱ्याची वाढती गरज लक्षात घेता शासनाच्या या अनुदानित योजनेचा शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होणार आहे.

शाळेत ये-जा करणाऱ्या अल्पवयीन मुलीवर वारंवार अत्याचार

सोमेश्वरनगर : बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मुलगी आणि तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी देऊन हा प्रकार सुरू असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या अत्याचारातून मुलगी गर्भवती झाल्यानंतर प्रकरण उघडकीस आले. याप्रकरणी निरगुडवाडी (ता. बारामती) येथील सतीश मोहिते याला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जून २०२५ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत आरोपीने पीडित मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असूनही ती शाळेत ये-जा करत असताना रस्त्यात अडवून तिच्याकडे मैत्रीची मागणी केली. मुलीने नकार दिल्यानंतर तिला व तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर तिला स्वतःच्या राहत्या घरी नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकारामुळे पीडित मुलगी गर्भवती झाल्याचेही तक्रारीत नमूद आहे.या प्रकरणी वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४(२)(एम), ६५(१), ७८, ३५१(२), ३५१(३) तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली. पुढील तपास वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी जीवन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राहुल साबळे करीत आहेत.

रस्ते सुरक्षेचा 'सासवड पॅटर्न' देशाला दिशा देणार!

देशातील पहिले रस्ते सुरक्षा संशोधन व प्रशिक्षण केंद्र पुरंदरमध्ये

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सासवड : वाहन चालविण्याचा परवाना मिळविताना होणारे गैरप्रकार, दलालांचा हस्तक्षेप आणि वाहनांच्या योग्यता तपासणीतील त्रुटींना आळा घालण्यासाठी पुरंदर तालुक्यातील सासवड येथे देशातील पहिले रस्ते सुरक्षा संशोधन व प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येत आहे. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी २ नोव्हेंबर रोजी प्रकल्पस्थळी भेट देऊन कामाची पाहणी केली. हे केंद्र संपूर्ण देशासाठी आदर्श ठरेल, अशा दर्जाचे उभारण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

सुमारे २५ एकर जागेवर उभारण्यात येणाऱ्या या केंद्रात स्वयंचलित वाहन चाचणी केंद्र, स्वयंचलित वाहनचालक चाचणी मार्ग आणि राज्य रस्ता सुरक्षा प्रशिक्षण व संशोधन संस्था असे तीन प्रमुख विभाग असतील. वाहनांची तांत्रिक तपासणी, चालकांच्या कौशल्याची परीक्षा आणि परिवहन विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण एकाच ठिकाणी होणार आहे.



वाहनांची तपासणी यंत्राद्वारे

स्वयंचलित वाहन चाचणी केंद्रात अत्याधुनिक संवेदक आणि चित्रण यंत्रणेद्वारे वाहनांची तपासणी केली जाईल. ब्रेक, दिवे, निलंबन यंत्रणा आणि धुराचे उत्सर्जन यांची तांत्रिक तपासणी होणार असल्याने मानवी हस्तक्षेप आणि गैरप्रकारांना आळा बसेल. वाहनांची योग्यता तपासणी अधिक पारदर्शक व अचूक होणार आहे.

चालकांच्या कौशल्याची कसोटी

स्वयंचलित चाचणी मार्गावर इंग्रजी आठ, एच आकाराचा मार्ग, चढ-उतार आणि अवघड वळणांच्या माध्यमातून चालकांची परीक्षा घेतली जाईल. चित्रफीत विश्लेषणाच्या आधारे चालकांच्या हालचालींचे मूल्यमापन करून गुणांकन केले जाणार आहे. त्यामुळे परीक्षकाच्या मर्जीऐवजी प्रत्यक्ष कौशल्यावर परवाना मिळणार आहे.

अधिकाऱ्यांनाही मिळणार प्रशिक्षण

राज्य रस्ता सुरक्षा प्रशिक्षण व संशोधन संस्थेत मोटार वाहन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, वाहतूक व्यवस्थापन, बदलते कायदे आणि रस्ता सुरक्षेचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. अपघातांची कारणे आणि उपाययोजनांवर संशोधनही केले जाणार आहे. अपघात रोखण्यासाठी केवळ नियम आणि दंडवसुली पुरेशी नसून आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि वैज्ञानिक दृष्टिकोन आवश्यक आहे. सासवडचे केंद्र देशासाठी आदर्श ठरेल, अशा दर्जाने उभारावे, असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. या प्रकल्पामुळे सासवड रस्ता सुरक्षा क्षेत्राचे राष्ट्रीय केंद्र बनण्याची अपेक्षा आहे.

सौर प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज; जीवनमान उंचावण्यास मदत : सुनेत्राताई पवार

पानमंदवाडीतील पाच मेगावॅट सौर प्रकल्पाचे लोकार्पण

पुणे (प्रतिनिधी) : शेतीच्या विकासासाठी सिंचनाचे पाणी, दिवसा वीज, आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतमालाला योग्य बाजारपेठ उपलब्ध होणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून, त्यांच्या जीवनमानात सुधारणा होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी केले.

खेड तालुक्यातील पानमंदवाडी येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या पाच मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण बुधवारी (दि. ४) सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. चाकण येथे राजगुरुनगर सहकारी बँकेच्या २० व्या शाखेच्या उद्घाटनप्रसंगी हा कार्यक्रम झाला. या प्रकल्पामुळे कडूस वीज उपकेंद्रांतर्गत २ हजार ५०४ शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार आहे.



शेतीपंपांसाठी रात्रीच्या वेळी शेतात जावे लागल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. दिवसा वीज उपलब्ध झाल्यामुळे सिंचनाचे नियोजन सोयीचे होईल. तसेच रात्रीच्या वेळी शेतात जाण्याची गरज कमी होणार असल्याने बिबट्या व अन्य वन्यप्राण्यांपासून शेतकऱ्यांची सुरक्षितताही वाढेल, असे पवार यांनी सांगितले.

पानमंदवाडी येथील या प्रकल्पासाठी सुमारे २० कोटी ७५ लाख रुपये खर्च आला असून, अवाडा कंपनीने त्याची उभारणी केली आहे. प्रकल्पातील वीज ५.८ किलोमीटर लांबीच्या ११ किलोव्होल्ट वाहिनीद्वारे कडूस येथील ३३ किलोव्होल्ट उपकेंद्रापर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

कडूस उपकेंद्रांतर्गत ८ हजार ६४३ वीजग्राहक असून, त्यात २ हजार ५०४ कृषी ग्राहक आहेत. वाढती मागणी लक्षात घेऊन पाच एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र बसविण्याचे काम सुरू आहे. ते पूर्ण झाल्यानंतर उपकेंद्राची क्षमता १५ एमव्हीए होणार आहे.

यावेळी आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीपअण्णा मोहिते पाटील, नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्यासह महावितरणचे अधिकारी, अवाडा कंपनीचे प्रतिनिधी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

आळंदीत माऊली मंदीरात आजपासून दिवाळी संगीत महोत्सव

आळंदी देवाची : श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या वतीने ५ ते ११ नोव्हेंबरदरम्यान श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात 'दिवाळी संगीत महोत्सव २०२६' आयोजित करण्यात आला आहे. या सात दिवसीय महोत्सवात दररोज पहाटे ६ ते ८ आणि सायंकाळी ६ ते ८ या वेळेत नामवंत कलाकार माऊलींच्या चरणी संगीतसेवा अर्पण करणार आहेत.



महोत्सवात महादेवबुवा शहाबाजकर, अजित कडकडे, धनंजय जोशी, नागेश आडगावकर, सुधाकर चव्हाण, सानिका कुलकर्णी, पांडुरंग सुपेकर, अवधूत गांधी, ज्ञानेश्वर मेश्राम, कौस्तुभ गायकवाड, मीनल दातार, पंडित सुरेश तळवलकर, कलापिनी कोमकली, आर्या आंबेकर आणि ऐश्वर्या सहस्रबुद्धे या कलाकारांचा सहभाग असणार आहे. या महोत्सवासाठी संस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ रामचंद्र देखणे, विश्वस्त ॲड.राजेंद्र बाबुराव उमाप, योगी निरंजननाथ गुरु शांतिनाथ, चैतन्य केशवराव लोंढे (कबीरबुवा), ॲड. रोहिणीताई पवार आणि पुरुषोत्तम मुरलीधर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली महोत्सव संपन्न होणार आहे. संगीतप्रेमी व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन संस्थान कमिटीच्या वतीने व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी केले आहे.

राष्ट्रीय नॅचरल बॉडीबिल्डिंग स्पर्धेत ऋषिकेश भोसलेची चमक

एक रौप्य, दोन कांस्य पदकांची कमाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



सोमेश्वरनगर : बारामती तालुक्यातील वाणेवाडी गावचे शरीरसौष्ठवपटू ऋषिकेश योगेश भोसले यांनी गोवा येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील नॅचरल बॉडीबिल्डिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विविध गटांमध्ये उत्कृष्ट शरीरसौष्ठव सादर करत त्यांनी एक रौप्य आणि दोन कांस्य अशी एकूण तीन पदके पटकावली. त्यांच्या या यशामुळे वाणेवाडी गावासह बारामती तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

आयसीएल (आय कॉम्पिट नॅचरल) या संस्थेच्या वतीने नैसर्गिक शरीरसौष्ठव करणाऱ्या खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे स्टेरॉइड्स, ड्रग्स अथवा प्रतिबंधित उत्तेजक द्रव्यांचा वापर न करता नैसर्गिक पद्धतीने शरीरसौष्ठव सादर करणाऱ्या खेळाडूंना प्राधान्य दिले जाते.

हवेली तालुकास्तरीय संपर्क स्मार्ट शाळा शिक्षक प्रशिक्षण लोणीकंद येथे संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वाघोली : शनिवार दि. ३१ ऑक्टोबर रोजी पीएमश्री जि.प. शाळा लोणीकंद येथे संपर्क स्मार्ट शाळा शिक्षक प्रशिक्षण संपन्न झाले.

पं. स. हवेलीचे गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. हवेली तालुक्यात १३५ जि.प. शाळांमध्ये संपर्क किटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अध्यापन केले जाते. नवीन अभ्यासक्रमातील बदलानुसार संपर्क किट अद्यावत करून शाळांना या प्रशिक्षणात देण्यात आले. या शैक्षणिक वर्षात नवीन १५ जिप शाळांनाही संपर्क किट देण्यात आले. तसेच संपर्क किटचा प्रभावी व १००% वापर करणाऱ्या २९ शिक्षकांचा सोमनाथ शिवले तालुका समन्वयक तथा विषयतज्ञ पं. स. हवेली व एकनाथ शिंदे सर मुख्याध्यापक जिप शाळा लोणीकंद यांच्या हस्ते टॉप टिचर अवॉर्ड देऊन सन्मान करण्यात आला. या प्रशिक्षणास ११० प्रशिक्षणार्थी शिक्षक उपस्थित होते. या सर्व शिक्षकांना बालाजी शिंदे, प्रवीण यादव, मयुरेश माळी व गणेश वाघमारे यांनी प्रशिक्षण दिले.

ग्रामपंचायत कासुर्डी खेबा ता. भोर जि. पुणे
बी-१ निविदा सूचना -१/२०२६-२

प्रशासक ग्रामपंचायत कासुर्डी खेबा ता. भोर जि. पुणे येथे मौजे कासुर्डी खे बा येथे खालील कामासाठी बी-१ पद्धतीने नोंदणीकृत पुरवठादार/संस्था/ठेकेदार यांच्याकडून निविदा बी-१ पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये दरपत्रक मागविण्यात येत आहे. दि. ०५/११/२०२६ सकाळी.१०.०० ते १२/११/२०२६ दु ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात. सदर निविदा दि १६/११/२०२६ रोजीसकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय मध्ये उघडण्यात येतील.

अ.क्र.	कामाचे नाव	परिणाम	कामाचा कालावधी	अनामत रक्कम	ठेकेदार वर्ग
१	मौजे कासुर्डी खे बा येथील सर्व मिळकतीचे फेर आकारणी करणे, मिळकत जिओ फेन्सिंग करणे व मिळकत नकाशे तयार करून मिळणेबाबत	प्रति मिळकत दर	१ महिने	५०००/-	पुरवठादार/ संस्था ठेकेदार
२	मौजे कासुर्डी खे बा येथे घरातून कचरा संकलन करणे, वाहतूक, वाहन व मनुष्यबळ उपलब्ध करणे	प्रतिमाह	६ महिने	५०००/-	पुरवठादार/ संस्था ठेकेदार
३	मौजे कासुर्डी खे बा येथे सी सी टीव्ही कॅमेरा दुरुस्ती व जोडणी	-	१ महिने	५०००/-	पुरवठादार/ संस्था ठेकेदार

निविदा अटी व शर्ती १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत कासुर्डी खेबा या नावाने चेक/कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावेत ३) इसारा रक्कम ग्रामपंचायत कासुर्डी खेबा या नावाने चेक/कॅश/ऑनलाईन/डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही.

श्रीम. शिल्पा दत्तात्रय जुनोनिकर
ग्रामपंचायत अधिकरी ग्रामपंचायत कामुडी खेबा

श्रीम. अमरजा रघुनाथ दंडे
प्रशासक ग्रामपंचायत कासुर्डी खेबा

निविदा सुचना
ग्रामपंचायत रेटवडी ता. खेड, जि.पुणे.
बी -१ निविदा सुचना क्र.३ सन २०२६-२०२७

ग्रामपंचायत रेटवडी, ता. खेड, जि.पुणे, येथे खालील कामांची सीलबंद निविदा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद पुणे यांचे कडील ग्रामपंचायत रेटवडी साठी योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून दोन लिफाफा पद्धतीने १५ % मागासवर्गीय फंड + १५ वा वित्त आयोग निधीतून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा ग्रामपंचायत रेटवडी यांचे कडील दि. ५/११/२०२६ ते १२/११/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी ०९: ३० ते ५:०० या वेळेत देण्यात येतील व शक्य झाल्यास दि. १३/११/२०२६ रोजी कामकाजाच्या वेळेस दु. ४ ते ५ या वेळेत उघडण्यात येईल.

अ.क्र.	कामाचे नाव	निर्भीचा प्रकार	अंदाजपत्रकीय रक्कम	निविदा फी	इमार रक्कम	ठेकेदाराचा वर्ग
१.	मोजे रेटवडी साठेनगर येथे भूमिगत गटर व्यवस्था करणे.	१५ %मागासवर्गीय फंड + १५ वा वित्त आयोग	३,६०,२२२ + GST	५००	५०००	खुला

टीप :- १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे अधिकार ग्रामपंचायतीला राखून ठेवला आहे.
२) कोणतेही करण न देता कोटेशन स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायत ला राहील.
३) सदर निविदा बंद लिफाफा मध्ये आवश्यक आहे.
सोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
१) पॅन कार्ड २) नोंदणी प्रमाणपत्र ३) GST रजिस्ट्रेशन ४) ३ वर्षे इनकम टॅक्स सर्टिफिकेट तरी या प्रमाणे या प्रमाणे निविदा प्रसिद्धी करावे असे.

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत रेटवडी, ता.खेड, जि. पुणे

सही/-
प्रशासक
ग्रामपंचायत रेटवडी, ता.खेड, जि. पुणे

ग्रामपंचायत गोरड म्हसवली ता. भोर जि.पुणे
बी-१ निविदा सूचना -१/२०२६-२७

प्रशासक ग्रामपंचायत गोरड म्हसवली ता. भोर जि. पुणे येथे मौजे गोरड म्हसवली येथे खालील कामासाठी बी-१ पद्धतीने जि.प. सार्वजनिक बांधकाम यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदर यांच्याकडून निविदा बी-१ दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये निविदा मागविण्यात येत आहे. दि. ०५/११/२०२६ सकाळी १०.०० ते १२/११/२०२६ दु ५०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात. सदर निविदा दि १६/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उघडण्यात येतील

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सह	अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सोजून	इसारा रक्कम	कोरे निविदा रक्कम	कामाचा कालावधी	ठेकेदार वर्ग
१	मोजे गोरड म्हसवली येथे भीम नगर येथील अंतर्गत रस्ता करणे	१९९९७८/-	१६९०१९/-	१६९०/-	२३६/-	३ महिने	सु.बे.अ.
२	मोजे गोरड म्हसवली येथे आस्कवडी येथील भीम नगर समाज मंदिर दुरुस्ती करणे	१५९९३१/-	१३४९६३/-	१३५०/-	२३६/-	३ महिने	सु.बे.अ.

निविदा अटी व शर्ती १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत गोरठ म्हसवली या नावाने चेक कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावेत ३) इसारा रक्कम ग्रामपंचायत गोरड म्हसवली या नावाने चेक/कॅश ऑनलाईन/डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत गोरड म्हसवली

प्रशासक
ग्रामपंचायत गौरड म्हसवली

भुमी अभिलेख कार्यालयाच्या इमारतीसाठी बुजवला नैसर्गिक जलस्त्रोत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिरूर : सध्या दुष्काळी परिस्थिती असताना या परीस्थिवर मात करण्यासाठी शासन स्तरावरून विविध उपाययोजना राबवत असून शिरूर शहरातील भुमी अभिलेख कार्यालयाच्या इमारतीच्या कामासाठी चक्क या कार्यालयाजवळून जाणारा नैसर्गिक जलस्त्रोत ओढा बुजविल्याची धक्कादायक बाब समोर आली असून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.याबाबत दै.राष्ट्र सह्याद्री वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर शिरूर उपविभागीय अधिकारी विठ्ठल जोशी यांनी गांभीर्याने दखल घेऊन शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांना सविस्तर चौकशी करून अहवाल पाठविण्याचे आदेश दिला आहे.

सध्या दुष्काळी परिस्थिती असताना या परीस्थिवर मात करण्यासाठी शासन स्तरावरून विविध उपाययोजना राबवत असून नैसर्गिक ओढे - नाल्यांची गाळ काढून खोलीकरण करणे, जलप्रवाहातील अडथळे दुर करणे,जमिनीतील पाणी



पातळी वाढविण्यासाठी पाणी अडवा पाणी जिरवा यांसारख्या विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत मात्र नागरिकांच्या जागा तसेच शेतजमिनींची शासकीय अधिकृत मोजणी करून हद्द कायम करणे आणि संबंधित जागेची मोजणी क प्रत उपलब्ध करून देणाऱ्या शिरूर भूमी अभिलेख कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या व वॉल कंपाऊंड बांधकाम ासाठी पुर्वीपासून असलेला नैसर्गिक ओढा बुजविण्यात आल्याचा धक्कादायक आरोप नागरिकांनी केला आहे.तहसील कार्यालयालगत सुरू असलेल्या या काम ाची महसूल प्रशासनाने तातडीने स्थळ पाहणी करून प्रत्यक्ष पंचनामा करावा,अशी मागणी नागरिकांमधून होत होती.पूर्वीपासून असलेला नैसर्गिक ओढा बुजवून त्याच ठिकाणी बांधकाम सुरू असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आल्यानंतर याबाबत नागरिकांनी भूमी अभिलेख कार्यालयाचे उपअधीक्षक अमोल भोसले तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या निदर्शनास आणून देवूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून बांधकाम करण्यात असल्याने नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

नैसर्गिक जलप्रवाह असलेल्या जागेवर बांधकामाला परवानगी कशी मिळाली ? तसेच या ठिकाणी ओढा अस्तित्वात असताना बांधकामासाठी निधी मंजूर करताना संबंधित यंत्रणांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी केली होती का ? नैसर्गिक ओढा भूमी अभिलेख विभाग व शिरूर सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित शासकीय यंत्रणांच्या शासकीय अधिकारी यांच्या निदर्शनास आला नाही का ? बांधकामासाठी जागा निश्चित करताना नैसर्गिक जलप्रवाहाची नोंद घेण्यात आली होती का ? असे अनेक प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात असून याबाबतच्या प्रसिद्ध झालेल्या बातम्यांची शिरूर उपविभागीय अधिकारी विठ्ठल जोशी यांनी गांभीर्याने दखल घेत सविस्तर चौकशीचा आदेश शिरूर तहसिलदार यांना देण्यात आला असल्याने नागरिकांचे लक्ष आता या चौकशी कडे लागले आहे.यांच्याकडून करण्यात येणाऱ्या सविस्तर चौकशीकडे नागरीकांचे लक्ष लागले आहे.

दखल

डोंगरे यांना 'चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके जयंतीनिमित्त सन्मान कलावंतांचा पुरस्कार'



अहिल्यानगर : सामाजिक क्षेत्रात सातत्याने विविध विधायक उपक्रम राबवून ग्रामीण विकासासाठी योगदान देणारे अहिल्यानगरचे सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके जयंतीनिमित्त दिला जाणारा सन्मान कलावंतांचा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. नाशिक येथे आयोजित कार्यक्रमात अभिनेत्री शिल्पा शाहीर यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. कलावंत विचार मंच, नाशिक आणि कमल फिल्म प्रोडक्शन, कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. म.सा. नाट्यगृह, पंडित नेहरू गार्डन, शालिमार, नाशिक येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री जयश्री वाघ होत्या. यावेळी स्वागताध्यक्ष सुनील मोफ्लढे, अभिनेत्री श्रुती देशमुख, कवी संजय आहेर, आनंदा साळवे, शाहीर सुनील चिंचोळीकर आदी उपस्थित होते. नाना डोंगरे हे स्व. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष असून ग्रामपंचायत सदस्य म्हणूनही कार्यरत आहेत. नगर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, साहित्यिक आणि धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, स्वच्छता अभियान, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिरे, मतदार जनजागृती, महिला सक्षमीकरण आणि स्त्री जन्माचे स्वागत अशा विविध उपक्रमांतून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.

वकिलांनी व्यावसायिक नीतिमूल्यांचे पालन करावे : ॲड. पठाण



निघोज : वकिली हा केवळ व्यवसाय नसून समाजाला न्याय मिळवून देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. त्यामुळे प्रत्येक वकिलाने व्यावसायिक नीतिमूल्यांचे पालन करून न्यायदान प्रक्रियेत सहकार्य करावे. व्यावसायिक मूल्यांची जपणूक न करणाऱ्या वकिलांवर बार कौन्सिलला डब्होकेट्स क्टनुसार कारवाई करण्याचे अधिकार आहेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य ड. अहमदखान पठाण यांनी केले. समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ लॉ कॉलेज, बेल्हे, ता. जुन्नर येथे प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभानिमित्त आयोजित पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी वसंतराव शेळके, माऊली शेळके, विवेक शेळके, वल्लभ शेळके, स्नेहलताई शेळके, प्रा.राजीव सावंत, डॉ.लक्ष्मण घोलप, डॉ. सुनील कवडे, शिवाजी कुमकर, प्रा. प्रदीप गाडेकर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन प्रा.कल्याणी दरेकर यांनी केले.पाहुण्यांचा परिचय प्रा.अविनाश कांबळे यांनी करून दिला, तर प्रा.अभिषेक सोनावणे यांनी आभार मानले.

राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात होणार विजेत्यांचा गौरव

अहिल्यानगर : दुष्काळाची कारणे, त्याचे भीषण परिणाम आणि दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याविषयी समाजात जनजागृती व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या काव्य लेखन स्पर्धेला जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दुष्काळाच्या वेदना, पाणीटंचाईचे वास्तव आणि जलसंवर्धनाचे महत्त्व कवींनी आपल्या कवितांमधून प्रभावीपणे मांडले. या स्पर्धेत वाघुंडे (ता. पारनेर) येथील संदीप रासकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डोंगरे व्यायामशाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नवोदित कवींच्या लेखनकौशल्याला आणि काव्यप्रतिभेला व्यासपीठ मिळावे, तसेच साहित्याच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर जनजागृती व्हावी.

श्रीगोंद्यात जमीन माफियांचा धुमाकूळ!

मृतांच्या जमिनीही सोडेनात; बनावट महिलांना उभे करून कोट्यवधींचे व्यवहार?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : तालुक्यात जमिनींच्या व्यवहारांमध्ये बनावटगिरीचे जणू रॅकेटच सक्रिय झाल्याचे चित्र समोर येत आहे. नामवंत अधिकारी, परगावी वास्तव्यास असलेले जमीनमालक, तसेच मृत व्यक्तींच्या जमिनी गुन्हेगारांच्या 'सॉफ्ट टार्गेट' ठरत आहेत. मूळ जमीनमालकांच्या जागी बनावट व्यक्ती, विशेषतः महिलांना उभे करून जमिनींची खरेदी-विक्री केल्याचे धक्कादायक प्रकार वारंवार उघडकीस आले आहेत. या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दरवर्षी अनेक गुन्हे दाखल होत आहेत. काही आरोपींना अटक झाली आहे, काहींना अंतरिम जामीन मिळाला आहे, तर अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

मात्र, या संपूर्ण प्रकारामागील मुख्य सूत्रधार कोण? बनावट कागदपत्रे तयार करणारे कोण? त्यांना साथ देणारे कोण? तसेच या व्यवहारांमधून नेमका कोणाचा आर्थिक फायदा झाला? या प्रश्नांची उत्तरे अद्याप पूर्णपणे समोर आलेली नाहीत. विशेष म्हणजे, काही खासगी बेकायदेशीर दस्तनोंदणी करणाऱ्यांवरही कारवाई करण्यात आली होती. त्यांना अटक झाल्यानंतर सध्या काही जण जामिनावर बाहेर आहेत.

काही प्रकरणांमध्ये बनावट दस्तनोंदणी उघड झाल्यानंतर संबंधित दस्त रद्द करण्यासाठी रद्दलेखही करण्यात आले आहेत. त्यामुळे अशा व्यवहारांची व्याप्ती किती मोठी आहे, याबाबत संशय व्यक्त होत आहे. काही प्रकरणांमध्ये बनावट मृत्यूपत्र तयार करणे, खोटे मृत्यू प्रमाणपत्र मिळवणे आणि त्याआधारे जमिनीवर हक्क सांगून ती परस्पर लाटण्याचे गंभीर प्रकार समोर आल्याची माहिती आहे. जिवंत जमीनमालक परगावी राहत असल्याचा फायदा घेत त्यांच्या जागी दुसऱ्याच व्यक्तीला उभे करणे, तर मृत व्यक्तींच्या वारसाहक्काचा बनावट आधार तयार करणे, अशा प्रकारांमुळे जमीन व्यवहारांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

एखादा बनावट दस्त तयार होतो, त्याची नोंदणी होते, जमिनीचे व्यवहार होतात आणि त्यानंतर प्रकरण उघडकीस येते. मात्र, या संपूर्ण साखळीतील प्रत्येक घटकाची सखोल चौकशी होऊन मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. केवळ प्रत्यक्ष व्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करून चालणार नाही; बनावट कागदपत्रे तयार करणारे, त्यासाठी मदत करणारे आणि आर्थिक लाभ घेणारे यांचाही शोध घेण्याची मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर काही सामाजिक संघटना आक्रमक झाल्या असून, लवकरच पुणे येथील नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळत आहे.

खा. लंके यांचा पारनेर येथील विजयी सभेत विरोधकांना इशारा

माझ्या विजयामागे सर्वसामान्यांची ताकद



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पारनेर : अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत सर्व प्रस्थापित शक्ती एकवटलेल्या असतानाही सर्वसामान्य मतदारांच्या पाठबळावर विजय मिळविला आहे. सर्वसामान्य जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांची निष्ठा हीच आपल्या विजयाची खरी ताकद आहे. बँकेत शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काम करणार असून, दहशत आणि दादागिरीच्या राजकारणाला भीक घालणार नाही, असा ठाम निर्धार खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला.

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर पारनेर येथे आयोजित विजयी सभेत ते बोलत होते. या वेळी त्यांनी निवडणुकीतील संघर्ष, मतदारांचा विश्वास, विरोधकांकडून करण्यात आलेले प्रयत्न, पोलिस प्रशासनाचा वापर, बँकेतील कथित अनियमितता आणि आगामी राजकीय वाटचालीबाबत परखड भूमिका मांडली.

खा. लंके म्हणाले, सर्वसामान्य लोक मला मदत करतात. मोठ्यांना मात्र माझा त्रास होतो. मी एकटा या निवडणुकीत विजयी झालो असलो, तरी बँकेत काम करण्यासाठी मी एकटाच पुरेसा आहे. तुमच्या आशीर्वादाने चक्रव्यूह भेदून मी विजयी झालो आहे. मी मागच्या दाराने येणारा नाही. 'जो टायगर होता है, वो अकेला आता है,' असे म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण केला. आपण विजयी होणार नाही, असे सांगणाऱ्यांना मतदारांनी उत्तर दिले आहे. तुम्ही मला रोखणारे कोण? हा स्वाभिमानी तालुका आहे. पैशांचे आमिष दाखविण्यात आले; मात्र मतदारांनी त्याला नकार दिला. परक्यांनी लक्ष घातल्याने मतदार अधिक जागरूक झाले, असे त्यांनी सांगितले.

तालुक्यातील विविध पक्षांच्या नेतेमंडळींनी आणि कार्यकर्त्यांनी आपल्याला मदत केली. उद्धव साहेबांची शिवसेना, शिंदे साहेबांची शिवसेना अशा विविध राजकीय पक्षांतील कार्यकर्ते आपल्या पाठीशी उभे राहिले. माझे कोणाशीही वैर नाही. ज्याच्याशी वैर करतो त्याच्याशी वैरच करतो आणि ज्याच्याशी मैत्री करतो त्याच्याशी मैत्रीच करतो. गद्दारी करणे आपल्या स्वभावात नाही. माझी मते ७० झाली असती; मात्र थोडा उशीर झाला, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बँकेचे ठराव सुरू झाल्यानंतर आपल्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले. ठरावासाठी पोलिस प्रशासनाचा वापर करण्यात आला. आज ना उद्या सत्ता बदलणार आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांनी कोणाचीही लाचारी पत्करू नये. नीलेश लंकेही गृहमंत्री होऊ शकतो, हे पोलिसांनी लक्षात ठेवावे. जो आम्हाला नडला, त्याला पाडल्याशिवाय आम्ही शांत बसत नाही, असा इशारा त्यांनी दिला.

ज्या प्रकाश गाजरे यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली, त्यांनीही मतदारांचे संपर्क क्रमांक पाठवून आपली निष्ठा कायम ठेवली. अशा निष्ठावंत कार्यकर्त्यांची ताकद आपल्या पाठीशी असल्याचे त्यांनी नमूद केले. छुपे डाव खेळण्यापेक्षा समोरून वार करा, असे आव्हानही त्यांनी विरोधकांना दिले.

पारनेरच्या स्वाभिमानाचा उल्लेख करत खासदार लंके म्हणाले, हा सेनापती बापटांचा तालुका आहे. झुकणारा, वाकणारा आणि स्वाभिमान विकणारा तालुका नाही. रावणाचे राज्य संपून रामराज्य आले, तसेच पारनेरमध्येही रामराज्य आले आहे. आजवरच्या निवडणुका पाहिल्या तर विरोधकांचा सुपडा साफ झाला आहे.

नीलेश लंकेचा अंत पाहू नका. दादागिरी आणि दहशत मला शिकवू नका. मी सगळे उकळून पिलो आहे, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना सुनावले. लोकसभेच्या निवडणुकीत तुम्हाला घरी पाठविले आहे.

ऊस वाहतूकदारांनो, नियम पाळा; अपघात टाळा! कर्जत पोलिसांचा पुढाकार



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

राशीन : ऊस गळीत हंगाम सुरू झाल्याने कर्जत तालुक्यात ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर व इतर वाहनांची वर्दळ वाढली आहे. या पार्श्वभूमीवर रस्ते अपघात रोखण्यासाठी कर्जत पोलिसांनी पुढाकार घेत बारडगाव सुद्रीक येथील अंबालिका साखर कारखान्यात ऊस वाहतूकदार व वाहनचालकांची विशेष बैठक घेतली.

पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी कारखाना व्यवस्थापनासह वाहनचालकांना सुरक्षित वाहतुकीबाबत मार्गदर्शन केले. यावेळी दारू पिऊन वाहन चालवू नये, ट्रॅक्टरवर मोठ्या आवाजात टेप लावू नये, वाहनांचा विमा उतरवावा, मागील बाजूस रिफ्लेक्टर बसवावेत, वेगावर नियंत्रण ठेवावे आणि वैध वाहन परवाना सोबत ठेवावा, अशा सूचना देण्यात आल्या. तसेच रस्त्यात वाहन बंद पडल्यास मागील वाहनांना सूचना मिळण्यासाठी योग्य दर्शक चिन्हे लावण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीत अंबालिका साखर कारखान्याचे एमडी चौगले यांनी महत्त्वाचा निर्णय जाहीर केला.

ॲट्रॉसिटी प्रकरणात बाळू धोत्रेला न्यायालयाचा दणका!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत दाखल गंभीर गुन्ह्यात आरोपी बाळू ऊर्फ बाळासाहेब काशिनाथ धोत्रे याला श्रीगोंदा सत्र न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. अटकपूर्व जामिनासाठी दाखल केलेला अर्ज न्यायालयाने ३ नोव्हेंबर रोजी फेटाळून लावला. त्यामुळे आरोपीच्या अडचणी वाढल्या असून या निर्णयाने परिसरात चर्चेला उधाण आले आहे. मात्र, न्यायालयाने ११ नोव्हेंबरपर्यंत अंतरिम संरक्षण कायम ठेवले आहे.

पिंपी कोलंदर येथे ७ एप्रिल २०२६ रोजी फिर्यादी आपल्या दुकानात असताना आरोपी बाळू धोत्रे याने तेथे येऊन जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर फिर्यादीने बेलवंडी पोलीस ठाण्यात धाव घेतली होती. त्यानुसार ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.या गुन्ह्यात अटकेची शक्यता लक्षात घेऊन आरोपीने न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने यापूर्वी अंतरिम संरक्षण दिले होते. दरम्यान, पोलिसांनी तपास पूर्ण करून २८ जुलै रोजी दोषारोपपत्र दाखल केले. अटकपूर्व जामीन अर्जाला विरोध करताना फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना आरोपीकडून धोका असल्याचा मुद्दा न्यायालयासमोर मांडण्यात आला. तसेच आरोपीच्या पूर्वीच्या गुन्हेगारी नोंदींबाबतही न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले. फिर्यादी पक्षाच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद आणि सरकारी पक्षाची बाजू विचारात घेत न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला.

उसाला प्रतिटन ५ हजार रुपये दर द्या; अन्यथा कारखान्यांतून साखर बाहेर पडू देणार नाही!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : महाराष्ट्रातील साखर उद्योगासमोरील विविध प्रश्न, आर्थिक अडचणी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीची महत्त्वपूर्ण बैठक बुधवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हीएसआय), मांजरी बुद्रुक येथे पार पडली. माजी नीती आयोग सदस्य तथा केंद्रीय उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष डॉ. रमेश चंद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी प्रतिनिधी अभिजीत दादा पोटे यांनी शिवसेनेच्या वतीने सहभागी होत ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि मागण्या आक्रमकपणे मांडल्या.

साखर उद्योगाची सद्यस्थिती, कारखान्यांसमोरील आर्थिक अडचणी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणारा दर आणि भविष्यातील धोरणात्मक उपाययोजना यांचा अभ्यास करून केंद्र शासनाला अहवाल सादर करण्याची जबाबदारी या समितीवर आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत राज्यातील शेतकरी प्रतिनिधी, साखर कारखाना क्षेत्रातील पदाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या भूमिका मांडल्या.

बैठकीत अभिजीत पोटे यांनी उसाला प्रतिटन ५ हजार रुपये दर मिळावा, साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) प्रतिकिलो ५० ते ५५ रुपये करावी, इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७५ रुपये निश्चित करावा, तसेच साखर कारखान्यांमधील वजनकाटे ऑनलाइन करून वजन प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशा प्रमुख मागण्यांवर जोर दिला.

निघोजमध्ये भव्य तालुकास्तरीय किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



निघोज : दिवाळी सणानिमित्त शिवबा सोशल फाउंडेशन अंतर्गत शिवबा दुर्गसंवर्धन परिवाराच्या वतीने भव्य तालुकास्तरीय किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, गडकिल्ल्यांचे महत्त्व आणि दुर्गसंवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश आहे.

या स्पर्धेत १६ वर्षांखालील विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार असून, किल्ल्यांची प्रतिकृती तयार करताना पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. स्पर्धकांनी किल्ल्याची रचना, ऐतिहासिक माहिती, नावीन्यपूर्ण कल्पना आणि सादरीकरण यांवर विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

स्पर्धेसाठी प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच इतर विशेष बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली आहे. सायकल, कॉम्प्युटर टेबल, घड्याळ, क्रिकेट किट, बॅडमिंटन किट आणि स्कूल बॅग अशी आकर्षक बक्षिसे विजेत्यांना देण्यात येणार आहेत. तसेच सहभागी विद्यार्थ्यांना 'शिवचरित्र' पुस्तक भेट देण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी नावनोंदणी करणे आवश्यक असून, प्रवेश शुल्क १०० रुपये ठेवण्यात आले आहे. स्पर्धेचे परीक्षण व्हिडिओ संकलनाद्वारे करण्यात येणार आहे. पारितोषिक वितरण समारंभ शनिवार, दि. १५नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास समजावा, गडकिल्ल्यांच्या संवर्धनाची प्रेरणा मिळावी आणि ऐतिहासिक वारशाबद्दल अभिमान निर्माण व्हावा, हा आयोजकांचा प्रयत्न आहे.

या स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शिवबा दुर्गसंवर्धन परिवाराच्या वतीने व शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे यांच्या वतीने ही करण्यात आले आहे.

मुस्लिम समाजाच्या जमात खानाची तातडीने देखभाल व दुरुस्ती करा : नगरसेविका बंग

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



पाथर्डी : स्वर्गीय माजी आमदार राजीव राजळे यांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या मुस्लिम समाजाच्या जमातखान्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.

मुस्लिम समाज बांधवांना विविध सार्वजनिक अथवा सामाजिक कामासाठी या वास्तूचा वापर करता येत नाही.

पालिकेने तातडीने याची देखभाल व दुरुस्ती करण्याची मागणी नगरसेविका दिपाली बंग व सामाजिक कार्यकर्ते रामनाथ बंग यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

याबाबत माहिती देताना रामनाथ बंग म्हणाले, माजी आमदार लोकनेते राजीव राजळे यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक या वास्तुला निधी उपलब्ध करत समस्त मुस्लिम बांधवांना दिलेले आश्वासन पूर्ण केले.

यामुळे मुस्लिम बांधवांची चांगली सोय होऊन धार्मिक सामाजिक व संस्कृतिक कार्यक्रम समाजाच्या व्यासपीठावर येथे होऊ लागले.

मात्र गेल्या आठ दहा वर्षात या वास्तूची देखभाल दुरुस्ती नसल्याने मुस्लिम समाज बांधवांची मोठी गैरसोय होत आहे. या सभागृहाची लाईट फिटिंग पूर्णपणे खराब झाली असून भिंतींची दुरुस्ती, रंगकाम पायऱ्यांचे व फरशीचे काम करावे लागणार आहे.

यापूर्वी ही पालिका प्रशासनाकडे मागणी करण्यात आली होती. आमदार मोनिका राजळे यांनी यासाठी विशेष लक्ष घालून पालिका प्रशासनाला अंदाजपत्रक तयार करत निधी उपलब्ध करून देण्यासाठी आदेश देण्याची गरज आहे.

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर या विभागात संथ गतीने सुरू असलेली रस्त्याची व गटारींची कामे तातडीने पूर्ण करत नागरिकांना निर्विघ्नपणे सण व उत्सव साजरे करू द्यावेत.

पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याची आश्वासन दिले.

खाऊच्या पैशातून विद्यार्थीनीनी फुलवले अनाथांच्या चेहऱ्यावर हसू....

कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनीसह शिक्षकांनी दिले स्नेहप्रेमच्या मुलांना दिवाळी गिफ्ट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कर्जत : दिवाळी म्हटली की नवीन कपडे, फटाके आणि मिठाई आलीच. मात्र याच आनंदापासून वंचित असलेल्या अनाथ व गरजू मुलांची दिवाळी गोड करण्यासाठी कर्जतच्या सोनमाळी कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वता खाऊच्या पैशांतून तब्बल २२ हजार रुपये जमा करीत आपल्या दिवाळीच्या आनंदात गरजवंत मुलांना देखील सामील करूयात या भावनेतून अनोखी दिवाळी गिफ्ट देण्याचा अभिनव उपक्रम राबविला. विद्यार्थीनीचे दातृत्व पाहून शाळेच्या शिक्षकांनी देखील १४ हजार रुपयांचे योगदान देत या उपक्रमाला हातभार लावला. एक पणती मायेची, एक दिवाळी आपुलकीची या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले.



यंदाच्या दिवाळी सणावर दुष्काळी परिस्थितीची झालर असून आपल्यासह इतर गरजवंत मुलांना सामील करूया आणि त्यांच्या चेहऱ्यावर हासू उमटूया या सोनमाळी कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मेहजबिन पठाण यांच्या संकल्पनेतून शालेय विद्यार्थिनींनी आपल्या खाऊचे पैसे एकत्र करीत तब्बल २२ हजार रुपयांची रक्कम जमा करण्यात यश मिळवले. विद्यार्थिनींची मदत रक्कम पाहून कन्या विद्यालयाचे शिक्षक देखील पुढे सरसावले त्यांनी १४ हजार रक्कम जमा केली.

३६ हजार रुपये रकमेतून कर्जतच्या स्नेहप्रेम संस्थेच्या ४० विद्यार्थ्यांना नवीन कपडे, मिठाई आणि भेट वस्तू रयत शिक्षण संस्थेचे इन्स्पेक्टर नवनाथ बोडके यांच्या हस्ते वाटप केले.

स्नेहप्रेमच्या अनाथ मुलं ही अनोखी दिवाळी भेट पाहून काही काळ हरवून गेले होते. काहींच्या चेहऱ्यावर हस्याची लकेर उमटली तर काहींच्या डोळ्यात आनंद अश्रू तरळले.

सोनाबाई नामदेवराव सोनमाळी कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींच्या अनोख्या संकल्पनेचे स्कूल कमिटी सदस्या मनीषा सोनमाळी, स्वाती पाटील, स्नेहालय संस्थेचे फारूक बेग, स्वाती ढवळे यांनी कौतुक केले.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

गुरुवार, दि.०५ नोव्हेंबर २०२६ । पान ८

करजगावचा विश्वंभर देवखिळे हाफ आयर्नमॅन स्पर्धेचा विजेता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नेवासा : तालुक्यातील करजगावचे सुपुत्र विश्वंभर विठ्ठलराव देवखिळे हा गोवा येथे झालेल्या आयर्नमॅन ७०.३ (हाफ आयर्नमॅन) स्पर्धेचा विजेता ठरला. आतरराष्ट्रीय स्तरावर आयर्न मॅन ही जगातील अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक क्रीडा स्पर्धा मानली जाते. यास्पर्धेत १.९ किलोमीटर समुद्रातील पोहणे, ९० किमी सायकलिंग आणि २१ किलोमीटर धावणे यांचा बाबींचा समावेश होता. विश्वंभरने ही स्पर्धा ७ तास १४ मिनिटे ५६ सेकंदांत फिनिश लाईन यशस्वीपणे पूर्ण केली. या स्पर्धेमध्ये जगामधील ६४ देशातील २००० खेळाडू सहभागी झाले होते. विश्वंभरणे १८ ते २४ वयोगटामध्ये वयोगटात ४४ वा क्रमांक मिळवून स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली. समुद्रामध्ये पोहत असताना त्याच्या हाताला जेलीफिशने दंश केला होता तरीही न थांबता त्याने वेळेत आपले टार्गेट पूर्ण केले. त्यानंतर सायकल व रन रूट मधील अडथळे पार करत सातत्य, शिस्त, जिद्द व कठोर परिश्रमाच्या बळावर स्पर्धेत यश मिळविले. सहा महिन्याच्या कठोर परीश्रम, जिद्द व सातत्य ठेवत आयर्न मॅन होण्याचे स्वप्न पूर्ण केल्याची प्रतिक्रिया विश्वंभर याने दिली. यापूर्वी त्याने बालेवाडी स्टेडियम पुणे येथे टायगर मॅन व ओझर येथे बर्गमन ही स्पर्धा पहिल्याच प्रयत्नात यशस्वीपणे पूर्ण केलेले आहे. विश्वंभर हा अँड. विठ्ठलराव देवखिळे यांचा मुलगा असून तो पुणे येथे उच्च शिक्षण घेत आहे.

टोळीयुद्धात २४ वर्षीय रोहितचा बळी; २६ जणांविरुद्ध गुन्हा; एकाला अटक

आरोपींच्या अटकेसाठी नातेवाइकांचा पोलीस ठाण्यात ठिय्या; मित्राचा आत्मदहनाचा प्रयत्न, दीड तास रास्ता रोको

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



वैजापूर : शहरातील टोळीयुद्धातून झालेल्या रक्तरंजित हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या रोहित अनिल पठारे (वय २४) याचा मंगळवारी रात्री उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेनंतर वैजापूर शहरात संतापाचा उद्रेक झाला. आरोपींच्या अटकेसाठी मृताच्या नातेवाइकांनी मंगळवारी मध्यरात्रीपासून बुधवारी दुपारी साडेतीन वाजेपर्यंत पोलीस ठाण्यात ठिय्या दिला. यावेळी एका मित्राने अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. तर संतप्त जमावाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात दीड तास रास्ता रोको केल्याने शहरातील वाहतूक विस्कळीत झाली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांना अतिरिक्त बंदोबस्त मागवावा लागला.

रोहितच्या मृत्यूची बातमी समजताच नातेवाइकांसह मित्रपरिवाराने पोलीस ठाण्यात धाव घेतली. हल्ल्यात सहभागी असलेल्या आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी त्यांनी केली. एवढा गंभीर हल्ला होऊनही आरोपी मोकाट कसे, असा सवाल उपस्थित करत त्यांनी पोलिसांना जाब विचारला. रात्रभर सुरू असलेला आक्रोश बुधवारी दुपारपर्यंत कायम होता. पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांनी आंदोलकांशी संवाद साधत आरोपींना पाठीशी घातले जाणार नसल्याचे आश्वासन दिले. मात्र, प्रत्यक्ष अटकेची मागणी करत नातेवाईक ठाम राहिले. याचदरम्यान रोहितच्या एका मित्राने अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलीस ठाण्यात एकच खळबळ उडाली. त्यानंतर संतप्त जमावाने आंबेडकर चौकात रास्ता रोको सुरू केला. काही आंदोलक रस्त्यावर झोपल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. तब्बल दीड तास वाहनांच्या रांगा लागल्या. संतप्त जमाव पाहून परिसरातील दुकानदारांनीही आपली दुकाने बंद केली.

उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरुवातीला हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. रोहितचा मृत्यू झाल्यानंतर गुन्ह्यात हत्या, अपहरण आणि ट्रॉसिटीच्या कलमांची वाढ करण्यात आली आहे. या प्रकरणात एकूण २६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून, बुधवारी पहाटे एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपींच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखेची तीन आणि वैजापूर पोलिसांची दोन अशी पाच पथके रवाना करण्यात आली आहेत. रोहितच्या पायावर दगडाने वार करून ठेचण्यात आले, तसेच शरीराच्या विविध भागांत स्क्रू ड्रायव्हर खुपसण्यात आल्याचा आरोप नातेवाइकांनी केला आहे. जखमी अवस्थेत पाणी मागत असतानाही त्याच्याशी अमानुष वर्तन केल्याचा आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, शहरातील तणावपूर्ण परिस्थिती लक्षात घेऊन जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांतील अधिकारी आणि दंगल नियंत्रण पथक तैनात करण्यात आले आहे. मात्र, वरिष्ठ पोलीस अधिकारी वेळेत घटनास्थळी न पोहोचल्याबद्दल नातेवाइकांनी नाराजी व्यक्त केली. या घटनेमुळे वैजापूरच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, उर्वरित आरोपींना तातडीने अटक करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

आक्रोशामुळे बाजारपेठ बंद

रोहितच्या नातेवाइकांनी बुधवारी दुपारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात रास्ता रोको करून संताप व्यक्त केला. नातेवाइकांचा आक्रोश आणि जमावाची गर्दी पाहून परिसरातील दुकानदारांनी खबरदारी म्हणून आपापली दुकाने बंद केली. त्यामुळे परिसरातील व्यवहार काही काळ ठप्प झाले.

मराठा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलतीसाठी शासन कटिबध्द : ना. विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



प्रवरानगर : मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा लागू करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतलेला असून योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे दुर करून या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश उपसमिती अध्यक्ष मंत्री विखे पाटील यांनी सर्व विभागाला दिले.

सह्याद्री अतिथिगृह येथे मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. यावेळी उपसमितीचे सदस्य मंत्री ड. आशिष शेलार, मंत्री दादाजी भुसे, मंत्री चंद्रकांत दादा पाटील, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, उपसमितीचे सचिव श्री. आप्पासो धुळाज, वैद्यकिय शिक्षण विभागाचे सचिव श्री.धिरजकुमार, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स व कृत्रिम बुध्दीमत्ता विभागाचे सचिव श्री. विरेंद्रसिंग, महाआयटीच्या आयुक्त श्रीमती एस.भुवनेश्वरी, सारथी संस्था, मराठा आरक्षण कक्ष व मंत्रालयातील अधिकारी उपस्थित होते.

उपसमितीचे सचिव .आप्पासो धुळाज यांनी बैठकीत विविध योजनांबाबत सादरीकरण केले. शैक्षणिक सवलती लागू करण्यासाठी आवश्यक ते सर्व शासन निर्णय तात्काळ काढण्यात यावेत. आवश्यकता असल्यास विभागाने प्रस्तावित शैक्षणिक सवलती आणि शिष्यवृत्ती योजनांसाठी आगामी हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांद्वारे आर्थिक तरतूद करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

मराठा समाजातील बेरोजगार युवक-युवतींसाठीची मोटार वाहन चालक-वाहक प्रशिक्षण योजना केवळ पुणे येथे केंद्रित न ठेवता जिल्हास्तरावर राबवावी. त्यासाठी 'सारथी'ने जाहिरात प्रसिद्ध करून इच्छूक संस्थांचे अर्ज मागवावेत, असेही मंत्री श्री. विखे पाटील यांनी स्पष्ट केले.इयत्ता ५वी ते १० वी या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना शालेय शिक्षण विभागामार्फत शिष्यवृत्ती योजना, परराज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्काव्यतिरिक्त प्रयोगशाळा शुल्क, ग्रंथालय शुल्क इत्यादी १६ बाबींची प्रतिपुर्ती, इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती मिळण्यास पात्र असणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी मराठा समाजातील विद्यार्थीही पात्र ठरणार आहेत. त्यामुळे पालकांवरील शिक्षणाच्या खर्चाचा मोठा भार हलका होईल असा विश्वास मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी शिवसेना ताकदीने आवाज उठवणार : आदित्य ठाकरे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पारनेर : शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी शिवसेना सातत्याने त्यांच्या पाठीशी उभी राहणार असून, त्यांच्या प्रश्नांना विधानसभेपासून लोकसभा आणि राज्यसभेपर्यंत ताकदीने वाचा फोडली जाईल, असा ठाम निर्धार शिवसेना नेते तथा माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला.

पारनेर येथे शेतकरी मदत केंद्र आणि जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या केंद्राच्या माध्यमातून शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्या शासनदरबारी मांडण्याचे काम केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात गेल्या चार वर्षांत अत्यंत घाणेरडे आणि धोकेबाज राजकारण झाले आहे.

आमदार, खासदार आणि मते विकत घेण्यासाठी सरकारकडे खोके आहेत; मात्र शेतकऱ्यांच्या वाट्याला केवळ धोके आले आहेत, अशा शब्दांत ठाकरे यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांपेक्षा सत्तेचे राजकारण महत्त्वाचे मानले जात असल्याची टीकाही त्यांनी केली.

या कार्यक्रमास विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार सुनील शिंदे, जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, युवा सेना जिल्हाप्रमुख निलेश खोडदे, तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका पद्मजा पठारे, युवा सेना तालुकाप्रमुख अनिल शेटे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोकुळच्या सत्तासंघर्षात नवा ट्विस्ट... पराभूत नेत्यांना संचालकपदाची संधी!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



कोल्हापूर : राज्याचे लक्ष लागलेल्या गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील आघाडीने १३ जागा जिंकत बहुमत मिळविले, तर मंत्री हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या आघाडीला १२ जागांवर समाधान मानावे लागले.

मात्र, निवडणुकीनंतर राज्य सरकारने सहकारी संस्थांसंदर्भात घेतलेल्या नव्या निर्णयामुळे गोकुळमधील सत्तासंघर्षाला वेगळे वळण मिळाले आहे. या निर्णयामुळे पराभूत झालेले नाविद मुश्रीफ आणि शौमिका महाडिक यांना शासननियुक्त संचालक म्हणून संधी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

राज्य मंत्रिमंडळाने वार्षिक उलाढाल ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक असलेल्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळावर पाच शासननियुक्त सदस्य नेमण्यास मंजुरी दिली आहे. यामध्ये सहाय्यक निबंधक दर्जाचा एक शासकीय अधिकारी आणि सहकार क्षेत्राचा अनुभव असलेल्या चार अशासकीय व्यक्तींचा समावेश असेल. शासकीय अधिकाऱ्याला मतदानाचा अधिकार नसेल; मात्र अन्य चार सदस्यांना मतदानाचा अधिकार असेल. हे सदस्य संस्थेच्या पदाधिकारी निवडणुकीस पात्र राहणार नाहीत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना हा निर्णय लागू होणार नाही.

या तरतुदीमुळे गोकुळच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे गणित बदलण्याची शक्यता आहे. शासननियुक्त सदस्यांमध्ये नाविद मुश्रीफ, शौमिका महाडिक, ए. वाय. पाटील आणि अशोक फरकटे यांच्या नावांची चर्चा सुरू आहे. मात्र, मित्रपक्षांना संधी मिळणार की नेत्यांच्या निकटवर्तीयांची नियुक्ती होणार, यावरून महायुतीत नाराजी असल्याचे वृत्त आहे. राज्यपालांकडून अध्यादेश निघाल्यानंतर नियुक्तीचा मार्ग मोकळा होणार आहे.

सतेज पाटील यांचा न्यायालयात जाण्याचा इशारा

आमदार सतेज पाटील यांनी या निर्णयाला तीव्र विरोध केला आहे. साडेपाच लाख दूध उत्पादकांनी दिलेला कौल डावलून मतदानाचा अधिकार असलेले चार अशासकीय सदस्य नेमणे म्हणजे लोकशाहीचा खून असल्याची टीका त्यांनी केली. या निर्णयाविरोधात सर्व कायदेशीर मार्गांचा अवलंब करणार असून न्यायालयात जाणार आहे.

जनाधार नाकारल्यास रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची तयारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे गोकुळच्या अध्यक्षपदाची निवडणूक आता केवळ संचालकांच्या संख्याबळावर नव्हे, तर शासनाच्या नव्या निर्णयावर आणि संभाव्य कायदेशीर लढाईवर अवलंबून राहणार आहे.

अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई; खाद्यतेलाची तपासणी

ग्राहकाच्या तक्रारीनंतर सात्रळमध्ये पथक दाखल; चार कंपन्यांचे नमुने प्रयोगशाळेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



सोनगाव : खाद्यतेलाच्या पॅकबंद डब्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न एका ग्राहकाच्या तक्रारीमुळे ऐरणीवर आला आहे. सोनगाव येथील एका दुकानातून खरेदी केलेल्या खाद्यतेलाच्या दोन डब्यांवर छिद्रे पाडून ती पुन्हा बंद केल्यासारख्या खुणा आढळल्याचा दावा ग्राहकाने केला आहे. या तक्रारीची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाच्या राहुरी व राहाता येथील अधिकाऱ्यांनी सात्रळ येथे तपासणी केली. यावेळी चार खाद्यतेल कंपन्यांचे नमुने ताब्यात घेऊन तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. मात्र, डब्यांवरील खुणांचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसल्याने प्रयोगशाळा अहवालाकडे लक्ष लागले आहे.

दिवाळीच्या खरेदीदरम्यान संबंधित ग्राहकाने सोनगाव येथील एका दुकानातून खाद्यतेलाचा डबा खरेदी केला होता. घरी गेल्यानंतर डब्यावर छिद्र पाडून ते पुन्हा बंद केल्यासारख्या खुणा दिसून आल्या. त्यामुळे ग्राहकाने त्याच दुकानातून दुसरा डबा खरेदी केला. मात्र, दुसऱ्या डब्यावरही अशाच स्वरूपाच्या खुणा आढळल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. एकाच दुकानातून घेतलेल्या दोन डब्यांवर समान स्वरूपाच्या खुणा दिसल्याने ग्राहकाने अन्न व औषध प्रशासनाकडे ऑनलाइन तक्रार दाखल केली.


तक्रारीनंतर प्रशासनाने सात्रळ येथे तपासणी केली. या वेळी चार खाद्यतेल कंपन्यांचे नमुने ताब्यात घेण्यात आले. संबंधित नमुन्यांची गुणवत्ता, पॅकेजिंग आणि सीलची स्थिती यांची प्रयोगशाळेत तपासणी होणार आहे. या तपासणीतून उत्पादनापासून ते ग्राहकापर्यंत पोहोचेपर्यंतच्या पुरवठा साखळीतील संभाव्य त्रुटींचा शोध घेण्यास मदत होऊ शकते. मात्र, या प्रकरणातील महत्त्वाचा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. डब्यांवरील खुणा उत्पादन किंवा पॅकेजिंग प्रक्रियेतील त्रुटींमुळे निर्माण झाल्या, वाहतूक अथवा साठवणुकीदरम्यान डबे खराब झाले की विक्रीपूर्वी त्यांच्याशी छेडछाड झाली, याबाबत सध्या कोणताही निष्कर्ष काढता येत नाही. त्यासाठी संबंधित उत्पादक, वितरक, वाहतूक व्यवस्था आणि विक्री केंद्र या सर्व टप्प्यांची वस्तुनिष्ठ तपासणी आवश्यक आहे.

विशेष म्हणजे, चार कंपन्यांचे नमुने ताब्यात घेण्यात आले असले, तरी केवळ नमुने घेतल्यामुळे संबंधित कंपन्या दोषी ठरत नाहीत. नमुने कोणत्या निकषांवर घेण्यात आले, त्यांची तपासणी कोणत्या प्रयोगशाळेत होणार आणि अहवाल किती कालावधीत प्राप्त होणार, याबाबत प्रशासनाकडून अधिकृत माहिती मिळणे आवश्यक आहे.

दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात खाद्यतेलासह पॅकबंद अन्नपदार्थांची खरेदी मोठ्या प्रमाणात होते. अशा वेळी पॅकबंद वस्तूंच्या सुरक्षिततेबाबत ग्राहकांचा विश्वास टिकविणे ही उत्पादकांइतकीच प्रशासनाचीही जबाबदारी आहे. ग्राहकांनी खरेदीवेळी डब्याचे सील, पॅकेजिंग, उत्पादनाची तारीख, बॅच क्रमांक आणि इतर आवश्यक माहिती तपासणे गरजेचे आहे. सोनगावमधील दोन डब्यांवरील संशयास्पद खुणांचे गूढ प्रयोगशाळा अहवाल आणि सखोल चौकशीनंतरच उलगडणार आहे. त्यामुळे या प्रकरणात घाईघाईने निष्कर्ष काढण्याऐवजी पुराव्यांच्या आधारे जबाबदारी निश्चित करणे आणि दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पांढरीपुल जवळ अपघात एक ठार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



घोडेगाव : अहिल्यानगर छत्रपती संभाजी नगर महामार्गावर पांढरीपुल घोडेगाव दरम्यान असलेल्या इंडियन ऑइल पेट्रोल पंपा जवळ कारला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने कार मधील चालक ठार झाला आहे रमाकांत प्रकाश शेटकर मयत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार मंगळवार (दि.३) रोजी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास पुणेहून संभाजीनगर कडे जाणाऱ्या एम. एच. २० सी.एस.७८१४ या हुंडाई कंपनीच्या कार गाडीला इंडियन ऑइल पेट्रोल पंपा समोर अज्ञात वाहनाने धडक दिल्याने कारचालक रमाकांत प्रकाश शेटकर वय ६० राहणार संभाजीनगर यांचा मृत्यू झाला रस्ताने जाणाऱ्या लोकांनी तात्काळ रुग्णवाहिका बोलावून अपघातातील जखमी व्यक्तीला अहिल्यानगर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले याबाबत सोनई पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सोनई पोलीस करत आहेत.

मराठवाडीत एकाच वेळी दोन विषारी घोणस आढळले

सर्पमित्राकडून सापांची नैसर्गिक अधिवासात मुक्तता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : नगर तालुक्यातील मराठवाडी येथे एकाच वेळी दोन अत्यंत विषारी घोणस साप आढळून आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दिवाळीच्या काळात दोन घोणस साप आढळल्याने नागरिकांमध्ये 'दिवाळी बोनस दोन घोणस' अशी चर्चा रंगली.

घटनेची माहिती मिळताच सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी दोन्ही घोणस सापांना अत्यंत काळजीपूर्वक आणि सुरक्षितपणे पकडले. त्यानंतर या दोन्ही सापांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

सध्या पावसाळ्यानंतरचे वातावरण आणि वाढते तापमान यामुळे साप मानवी वस्तीकडे येण्याच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी नागरिकांना सापांबाबत महत्त्वाचे आवाहन केले आहे.

साप हा पर्यावरणातील महत्त्वाचा घटक असून निसर्गाचा समतोल राखण्यात त्याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे साप दिसल्यास घाबरून जाऊ नये किंवा त्याला मारण्याचा प्रयत्न करू नये. सापापासून सुरक्षित अंतर ठेवावे आणि तातडीने प्रशिक्षित सर्पमित्र किंवा संबंधित वन्यजीव बचाव पथकाशी संपर्क साधावा, असे त्यांनी सांगितले.

घोणससारखा अत्यंत विषारी साप मानवी वस्तीत आढळल्यास नागरिकांनी स्वतःहून त्याला पकडण्याचा प्रयत्न करू नये. घटनास्थळी गर्दी करू नये, परिसर सुरक्षित ठेवावा आणि प्रशिक्षित सर्पमित्रांना पाचारण करावे, असे आवाहन कृष्णा पाटील बेरड यांनी केले आहे.